**5. वनहक्क कायद्यासाठी लढे:** जंगलांशिवाय आदिवासी व आदिवासींशिवाय जंगले अस्तित्वातच राहू शकत नाही. आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर त्यांना जंगलातून बाहेर काढून शहरी किंवा नागरी जीवनात वसवायचेठरविले तर हा त्यांचा वंशच्छेदच ठरेल आणि ते व्यावहारिकदृष्ट्या कुठल्याही शासन व्यवस्थेला शक्य नाही. या समूहांचा खऱ्या अर्थाने विकास प्रवाहाशी समन्वय साधायचा असेल तर त्यांच्या जल, जंगल, जमीन या नैसर्गिक संसाधनांवरील हक्कांना मान्यता दिली पाहिजे. त्यांच्यापर्यंत शिक्षण, आरोग्य, रोजगाराच्या संधीपोहोचविणे आणि नैसर्गिक साधनांचे व्यवस्थापन करून त्यांना मुलभूत अधिकार देणे हाच एक मार्ग आहे. हे ओळखून कॉं. नानासाहेब मालुसरे, कॉं. ढवळे, कॉं आ. जे.पी. गावित यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात वनजमिनीवर हक्कासाठी चळवळ १९९० च्या दशकात सरू केली. मार्क्सवादी कम्युनिस्ट नेतृत्वाच्या वतीने ठाणे, नाशिक, नंदुरबार येथील आदिवासी समूहाने सतत मोर्चे, जेलभरो आंदोलन करून सरकार दरबारी प्रश्न तेवत ठेवला. त्याची परिणीती २००६च्या वन हक्क कायद्यात झाल्याचे दिसून येते.

शेतकऱ्या संदर्भात महाराष्ट्रात विविध लढे उभारले गेलेळे आहेत. राज्यकर्त्यांनी शेतकरीचे प्रश्न सोडविताना शेतीचे नियोजन केले नाही तसेच शेतकऱ्यांना भरीव आर्थिक स्वरुपाची मदत दिली नाही. कारण हा असंघटीत समूह आहे. त्या असंघटीतपणाचा सरकारने फायदा घेतला असून ग्रामीण चळवळी पेक्षा नागरी हित जवळचे त्यांना वाटते.



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

या कारणामुळे शेतकऱ्याचे जीवन हे प्रकाशमान होण्यापेक्षा अंधकारमय जास्त होत गेलेले आहे. आजचा शेतकरी हा जास्तीत जास्त अल्पभूदारक असून तो कर्जबाजारी आहे त्याचे कुटुंब पूर्णपणे जीवन हलाखीचे जगात आहेत. देशातील सर्वच शेतकरी समाजाचे जीवन संकटमय बनले आहे. आर्थिक प्रश्नामुळे त्यांचे सामान्य जीवन आधुनिक नागरीकरण आणि शिक्षण पासून वंचित आहे. त्यामुळेच शेतकरी वर्ग आत्महत्या सारख्या चक्रात अडकला गेला आहे.

### महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याचे वास्तव

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्यूरोच्या ताज्या आकडेवारीतून शेतकरी आत्महत्यांचं भीषण वास्तव समोर आलं आहे. २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये शेतकरी आत्महत्येच्या घटनांमध्ये तब्बल ४२ टक्क्यांनी वाढ झाली असून यातील सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार २०१४ मध्ये देशात ५ हजार ६५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली तर २०१५ मध्ये ८ हजार ७ सातशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

देशातील अनेक राज्यांना २०१४ आणि २०१५ या दोन वर्षांमध्ये दुष्काळाचा सामना करावा लागला होता. त्यात महाराष्ट्राचाही समावेश होता. परिणामी महाराष्ट्रातच शेतकरी आत्महत्येच्या सर्वाधिक घटना घडल्या आहेत. महाराष्ट्रात एकूण ३ हजार ३० शेतकरी आत्महत्या झाल्या असून एकूण आत्महत्यांच्या तुलनेत हे प्रमाण ३७.८ टक्के इतके आहे. त्याखालोखाल तेलंगणमध्ये १ हजार ३५८ तर कर्नाटकमध्ये १ हजार १९७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा व अन्य कारणांमुळे जीवनयात्रा संपवली. महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि कर्नाटक या राज्यांमध्ये मिळून ९४.१ टक्के आत्महत्या झाल्या आहेत. विशेष म्हणजे बिहार, पश्चिम बंगाल, गोवा, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, झारखंड, मिझोराम, नागालँड राज्यात आत्महत्या झाल्या नाहीत.

शेतक-यांचे जीवनमान सुधारण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने जलयुक्त शिवार, शेततळी, शेतकरी पॅकेज घोषित केले असले तरी गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात सर्वाधिक आत्महत्या झाल्या असल्याची माहिती समोर आली आहे. इतर राज्याच्या तुलनेत ही आकडेवारी चिंता निर्माण करणारी आहे. आत्महत्याग्रस्त राज्यात मध्य प्रदेशचा दुसरा क्रमांक आहे.

महाराष्ट्रात शेतीचा शाश्वत विकास करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. विशेषतः शाश्वत सिंचन निर्माण होण्यासाठी जलयुक्त शिवार योजनेवर विशेष भर देण्यात आला आहे. राज्यावर कितीही संकटं आली तरी कृषी विभागाच्या निधीत कपात करण्यात आलेली नाही, असे सरकारच्या वतीने सांगितले जात असले तरी राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्येची आकडेवारी मात्र इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आहे. गेल्या तीन वर्षात राज्यात ८ हजार, ६५१ शेतक-यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्राचे शेजारी प्रांत असलेल्या मध्य प्रदेश, कर्नाटक आणि गुजरातपेक्षा महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षात सर्वाधिक आत्महत्या झाल्या आहेत. मध्य प्रदेशात ४ हजार ९८, कर्नाटकात २ हजार ४४८, तर गुजरातमध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. देशाच्या नकाशावर नजर टाकली असता शेतकरी आत्महत्येत महाराष्ट्र सर्वात वरचा, तर मध्य प्रदेशचा दुसरा क्रमांक असल्याचे दिसून येते.

२००१ ते २०१६ पर्यंतच्या या दोन राज्यांतील शेतकरी आत्महत्यांचे आकडे बघितल्यास गेल्या दहा वर्षात महाराष्ट्रात २४ हजार ३१५ तर मध्य प्रदेशात २१ हजार ३७८ शेतकऱ्यांनी जीवन संपविल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. खालील तक्त्यात देशातील तीन राज्यात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या होतात त्याचे विश्लेषण केल्यास  शेतकारी प्रश्नाचे वास्तव समोर येते.

| सन | महाराष्ट्र | मध्यप्रदेश | कर्नाटक |
|---|---|---|---|
| २०१४ | १९८१ | ८२६ | १२२ |
| २०१५ | ३२२८ | १२९० | १४७८ |
| २०१६ | ३०५२ | ४०९८ | २४४८ |

मागील तीन वर्षातील शेतकरी आत्महत्या स्थिती दर्शविणारा तक्ता:

**शेतकऱ्यांचे प्रश्न**

१. शेती मालाला हमीभाव देणे
२. भौगालिक स्थिती व समस्यांचे वेगळेपण
३. नैसगिक आपत्ती व ग्राहक हिताचे शासकीय धोरणामुळे आर्थिक संकट
४. वदलती कुटुंब व्यवस्था आणि शेतीवर होणारा परिणाम
५. कर्ज वाजारीपणाची कारणे

**उपाय**

१. शेती अधिक उत्पादकता वाढविणे
२. पाणी, वीज आणि रस्त्यांची उपलब्धता
३. पाणी,सिचन, आधुनिक तंत्रज्ञानाविषयी जनजागृती
४. उत्पादित वाणे विकसित करणे व संशोधन क्षेत्राची कक्षा रुंदावाने
५. जोड व्यवसाय चांगली पशु वैद्यकीय सेवा निर्माण करणे



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

मूल्यमापन

आधुनिक महाराष्ट्र हा पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो एकूण लोकसंख्येपैकी महाराष्ट्रात आज ५८ टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. शेतकरी हा विविध जाती समूहात विभागाला गेला असल्या कारणामुळे त्यांचे संघटन होऊ शकत नाही. त्यामुळेच सत्ताधीस वर्ग त्यांच्या असंघटीत पानाचा फायदा घेऊन त्यांच्या मागण्या व आंदोलने सहज मोडीत काढत आला आहे. असे असले तरी आजचा शेतकरी अनेक समस्यांनी घेरला गेला आहे हे वास्तव नाकारता येत नाही. शेतकरी प्रश्नावर उपाय म्हणजे सरकारने सर्वसकट कर्जमाफी करावी असे नाही. तर शेतकरी जीवनमान सुधारणेसाठी सरकारने शेतकरी वर्गात आधुनिक तंत्रज्ञान व शिक्षण यांचा समन्वय साधून शेतकरी वर्ग स्वावलंबी कसा बनेल असे कृती कार्यक्रम आखणे गरजचे आहे.

संदर्भ

१. प्रदीप पुरंदरे- सिंचन नोंदी परिवर्तन माला -१ सचिव एस. एम.जोशी सोशालिस्ट फाउंडेशन साने गुरुजी स्मारक, सिंहगड रस्ता, पुणे प्रथमावृत्ती जुलै १९९२
२. रमेश पाध्ये- शेती शेतकरी आणि अर्थकारण, युनिक अकॅडेमी प्रथमावृत्ती मार्च २०१५
३. रमेश पाध्ये, मक्स किसान- ३० सप्टेंबर २०१७
४. डॉ. वुधाजीराव मुळीक- महाराष्ट्र टाईम्स, २३ नोव्हेंबर २०१७
५. चिंतामन पाटील- विवेक
६. प्रहार दैनिक, १७ नोव्हेंबर २०१७
७. म.टा. विनोबा आणि भूदान- प्रा. गगनेश राऊत 26 एप्रिल २०१५
८. गोदावरी परुळेकर, जेव्हा माणूस जागा होतो मौजे प्रकाशन गृह १९९४
९. प्रा. गणेश राऊत व प्रा. ज्योती राऊत, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स. १८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन्स सप्टेंबर २००५

Scanned with OKEN Scanner

27

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

February 2019, Issue-50, Vol-01

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

istry of Rural Development. Government of India) Rajendranagar. Hyderabad.

Centre for Development Research and Action. (२००३). Micro Finance and Empowerment of Scheduled Caste Women: An Impact Study of SHGs in Uttar Pradesh and Uttaranchal. BL Centre for Development Research and Action. Vikas Nagar. Lucknow.

काटोले, रविंद्र. (२००६). महिला बचत गट. पुणे : महावीर प्रींट. गोडवा प्रकाशन.

मुखर्जी, रविंद्रनाथ. (२००५). सामाजिक शोध एवं सांख्यिकी. दिल्ली : विवेक प्रकाशन.

नागर, कौलाशनाथ. (१९९६). सांख्यिकी के मूलतत्व. मेरठ: मीनाक्षी प्रकाशन.

शर्मा, आर. ए. (२०१३). अनुसंधान के मुलतत्व एवं शोध प्रक्रिया. मेरठ : आर लाल बुक डिपो.

शुक्ल एस. एन., सहाय शिवपूजन. (२००४). सांख्यिकी के सिध्दांत. आगरा : साहित्य भवन पब्लिकेशन.

□□□

# सामाजिक चळवळीच्या ऱ्हासात लोकशाहीचे भविष्य धोक्यात ?

प्रा. डॉ. गोकुळ मुंढे
राज्यशास्त्र विभाग,
श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर

**प्रस्तावना :**

आज आपण उदारीकरणोत्तर नवतंत्रावर अरुढझालेल्या भांडवली पर्वात वावरत असून हे जग प्रचंड आभासी, संकूचित आणि भविष्याचा विचार गांभियनि न करणारे आहे. या प्रस्तुत समाज व्यवस्थेतील नवभांडवली अर्थनितीने व्यक्ति व समाज, समाज आणि राज्यव्यवस्था यांच्यातील जैविक नाते संबंधालाच सुरुग लावलेला आहे. त्यामुळे सहिष्णुतेच्या व सहकार्याच्या मूल्यांचा येथे ऱ्हास होतांना दिसत आहे. त्याऐवजी समाजामध्ये धर्मवादी, जातीवादी, प्रदेशवादी व गांववादी अशा संकूचित मूल्यांचे अधिष्ठान वाढत असल्याचे निर्देशित होत आहे. म्हणून तर व्यापक सामाजिक हितांच्या प्रश्नांसाठी लोक एकत्र येत नाहीत किंवा तशा प्रकारच्या चळवळी व संघटना उभारल्या जातांना दिसत नाहीत. त्यातही ज्या काही संघटना व चळवळी उभ्या रहात आहेत, त्यांच्यात उपरोक्त संकूचित विचारांचा प्रदरभाव अधिक भरलेला दिसतो. त्यामुळे आजच्या चळवळी व संघटनामध्ये व्यक्ति व समाज, समाज व राज्य यांच्यातील नागरिकत्वासाठीचा सुसंवाद पुसट झाल्यामुळे या नव अर्थनितीने आपल्या नितीमूल्यांचा विस्तार केलेला आहे. म्हणून तर लोकशाहीतील नागरिक म्हणून जे हक्क अधिकार असतात त्या आवकाशचा विस्तार होतांना दिसत नाही.

प्रस्थापित व्यवस्थेच्या नकारात्मक धोरणाच्या विरोधात जनसंघटन उभारुन संबंधित व्यवस्थेला



Scanned with OKEN Scanner

या भूतकाळात न झालेल्या घडामोडींचा वर्तमानकालीन अविष्कार असतात. समाजाला आधुनिक व गतीशील करण्याचे कार्य संघटना व चळवळी करीत असतात. त्यामुळेच महाराष्ट्रात अनेक क्षेत्रात स्थित्यंतरे घडून आलेली आहेत. (देशपांडे वसंत, १९८८) खरं तर येथील कामगार चळवळीला राष्ट्रीय नेतशत्व स्वातंत्र्यपूर्व काळापासून लाभलेलं आहे. लोखंडे, रुईकर, जोशी यांच्या नंतर डांगे, बर्धन, दत्ता देशमुख या नेत्यांनी या चळवळींना व्यापक सामाजिकतेचा आयाम दिला मात्र आज ती परिस्थिती राहिलेले नाही.

खरं म्हणजे सामाजिक चळवळी व संघटनांचा व्यक्तिशी असणारा संबंध उत्तरोत्तर अधिक प्रगल्भ बनावा अशी अपेक्षा असते. कारण समाजकारणातील सत्ता व्यवहार हा आदर्श मुल्ये निर्माण करण्यासाठी अव्याहातपणे चालणारा मानवी व्यवहार आहे. परंतु राज्यसत्ता व समाजातील अभिजन सत्ता ही उपेक्षितांच्या शोषणांवर आधारलेली असल्याने या शोषण मुक्तीच्या धडपडीतून विविध चळळींचा उदय होतो. त्या मग पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठीची स्वातंत्र्यांची चळवळ असेल किंवा अभिजन व्यवस्थेकडून वंचितांच्या व स्त्रियांच्या वर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधातील 'सामाजिक न्यायासाठीची' चळवळ असेल या सर्वांचा मुख्य उद्देश हा राज्य व समाज व्यवस्था यांच्यातील सुसंवाद निर्माण करुन आधुनिक राज्य आणि समाज व्यवस्था स्थापित करणे हा असतो. (सुमंत यशवंत, २००८) मात्र आधुनिक समाजमधील आदर्शवादी मूल्ये आणि प्रस्तापित राज्यव्यवस्थेचे सत्तात्मक स्वरुप या दोघांमधील संघर्षातून दोन्ही गोष्टी घडतात. एक म्हणजे लोकशाहीचा आवकाश आधुनिक नवनिर्मितीच्या अंगाणे व्यापला जातो. नाही तर दुसरा लोकशाहीच्या आवकाशचा फायदा उठवत सर्वकंषवादी व संस्कृतीवादी राज्य व समाजाच्या सत्तेवर नियंत्रण मिळवतात आणि नेमकी हीच परिस्थती संबंध देशात निर्माण झालेली आहे. म्हणून आज लोकशाहीच्या या आवकाशला सकारात्मक आयाम देण्याचे काम प्रस्तुत संघटनांनी व चळवळींनी पुढकार घेऊन करणें आवश्यक आहे. ती होतांना दिसत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

भारतीय स्वातंत्र्य नंतरच्या पहिल्या व दुसऱ्या दशकात लोकशाहीची आशेय घनता व्यापक करण्यामध्ये दोन प्रमुख घटना घडल्या एक म्हणजे संसदीय राजकारणाच्या विस्तारासाठी पक्षीय राजकारण व प्रौढ मतदान प्रक्रिया सन १९५० च्या दशकानंतर येथील पक्षीय राजकारणाच्या कार्यपध्दतीमुळे निवडणुकीच्या स्पर्धेतून व प्रौढमताधिकाराच्या विस्तारातून भारतातील सामाजिक श्रेष्ठीजनांची अभिजनशाही मोडीत निघून सर्व स्तरातील घटकांचे राजकीय सामाजिकरण झाले व लोकशाहीचा संस्थात्मक आवकाश विस्तारला. त्याच प्रमाणे या राजकीय सामाजिकरणामुळे शहरी व ग्रामीण क्षेत्रातील विकास प्रक्रियेला लोककल्याणकारी व समाजवादी धोरणाची जोड दिल्याने जात व व्यवसाय, मालक व मजूर यांचे नाते धुसर झाले. (पळशीकर सुहास, २००३) हे दोन्ही परस्पर विरोधी असणारे वर्ग राजकीय पक्ष पध्दतीने व निवडणुकीतील मतदानामुळे त्यांना समान सामाजिक आधाराची ओळख मिळाली आणि दुसरी घटना म्हणजे सन १९६० च्या दशकात बिगर संसदीय राजकारणाच्या बाहेरील समाज व्यवस्थेची. हा काळ जगभरातील उत्साही व परिवर्तन करु पहणाऱ्या तरुण वर्गाच्या बंडाचा काळ होता. जर्मन, फ्रान्स, अमेरिका, इंग्लंड, चिन व व्हितनाम या राष्ट्रातील तरुण व कामगार वर्गाने प्रस्तापित समाज व शासन व्यवस्थेच्या विरुध्द आंदोलने, मोर्चे घेराव व सांस्कृतिक क्रांतीसारख्या चळवळींच्या माध्यमातून लोकसंघटन उभारले होते. सामाजिक समता व शोषण मुक्तीच्या हक्कांसाठी हा वर्ग रस्त्यावर उतरुन आपली भूमिका मांडत होता. (सुमंत यशवंत, २०१८) हे परराष्ट्रातील वादळ भारतात व महाराष्ट्रात दाखल झाले. याच काळात भारतीय लोकशाही प्रक्रियेत सामाजिक प्रश्नांच्या अनुषंगाने अनेक प्रश्न व समस्यांचा आवकाश उपलब्ध होताच तो भरुन काढण्यासाठी विशेषत: महाराष्ट्रात युक्रांदच्या माध्यमातून तरुणांची समाजवादी विचारांची एक चळवळ उभी राहिली, भांडवली आर्थिक शोषणातुन मार्क्सवादी विचारधारा असणारी कामगारांची चळवळ व तरुणांचा 'मागोवा' गट उभा राहिला. म. फुले यांच्या विचारधारेतून स्त्रियांच्या मनाविरोधाची चळवळ उभी राहिली. डॉ. आंबेडकरांच्या विचार प्रवाहातून सामाजिक समतेसाठीची दलित पॅंथर व साहित्यांची



Scanned with OKEN Scanner

उपाययोजना वरील प्रमाणे सांगता येतील.

संदर्भ सुची :

भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टीक्षेप, प्रा.डी आर जगताप, प्रशांत पब्लिकेशन.

अर्थशास्त्र कोश, प्रा. डॉ. यंशवंत रारावीकर, डायमंड पब्लिकेशन.

❑❑❑

34

# भारताच्या निर्यात व्यापारात कृषी क्षेत्राचे योगदान

प्रा. श्री. जाधव संतोष ज्ञानदेव
सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
गौतमनगर, कोळपेवाडी , ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

***********

**प्रस्तावना**

जगातील विविध देशांच्या अर्थव्यवस्थांचे विकसित विकसनशिल व मागसलेल्या अर्थव्यवस्था असे वर्गिकरण केले जाते. ज्या राष्ट्राचे दरडोई उत्पन्न अमेरिकेच्या दरडोई उत्पन्न अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाच्या एक चतुर्था अंशापेक्षा कमी आहे अशा अर्थव्यवस्थाचासमावेश विकसनशिल अर्थव्यवस्थामध्ये केला जातो. विकसनशिल अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखल्या जातात. भारतीय अर्थव्यवस्था ही एकविकसनशिल अर्थव्यवस्था आहे.कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.भारताच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे.१९५० मध्ये कृषी क्षेत्राचा एकून देशांतर्गत उत्पादनातील वाटा ५०% पेक्षाही जास्त होता.२०१४-१५ मध्ये हे प्रमाण १६.१% पर्यंत घटलेले आहे.स्वातंत्र्योत्तर काळात कृषी क्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नातील प्रमाण कमी झालेले असले तरी कृषी क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्व कमी झाले आहे; असे म्हणता येणार नाही.

भारतासारख्या अतिरीक्त लोकसंख्या असलेल्या देशात रोजगार, अन्नधान्य, जनावरांसाठी चारा, औद्योगीक क्षेत्रासाठी कच्चा माल, किंमत स्थैर्य व परकीय चलनाची प्राप्ती इ.दृष्टीने कृषी क्षेत्राचे स्थान महत्वाचे आहे.

देशाच्या आर्थिक विकासाच्या पक्रियेत परकीय व्यापाराचे स्थान महत्वाचे आहे.देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला गती देण्याचे काम आंतरराष्ट्रीय व्यापार करतो.प्रा.रॉबर्टसन यांनी 'परकीय व्यापार हे आर्थिक विकासाचे इंजिन आहे.' (Foreign trade is an Engine of economic growth) असे मत मांडले.भारताचा विदेशी व्यापार हा प्रामुख्याने कृषी क्षेत्राशी निगडीत आहे.भारतात कृषी उत्पादनाबाबत सधनता असल्याने भारतातून मोठ्या प्रमाणावर



Scanned with OKEN Scanner

कृषी मालाची निर्यात केली जाते.भारताला दुर्मिळ असे परकीय चलन मिळवुन देण्यात कृषी निर्यातीचा मोठा वाटा आहे. भारतातून चहा, कॉफी, साखर, ताग, तंबाखू, चामडे, फळे, भाजीपाला आणि अन्नधान्य इ.कृषी मालाचे निर्यात करून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळविले जाते. या चलनाचा वापर आर्थिक विकासासाठी आवश्यक कच्चा माल, यंत्रसामुग्री व खनिजतेलाच्या आयातीसाठी केला जातो.स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या कृषी निर्यातीचे आकारमान, रचना व दिशा यात अमुलाग्र बदल झालेले आहेत.'भारताच्या निर्यात व्यापारात कृषी क्षेत्राचे योगदान' हा विषय प्रस्तूत शोध निबंधाच्या अभ्यासासाठी निवडण्यात आला आहे.

**अभ्यास विषयाची उद्दिष्ट्ये-**

प्रस्तूत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहे.

१. एकूण कृषी निर्यात मूल्यात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

२. भारतीय कृषी निर्यात व्यापारातील अडथळ्यांचा शोध घेणे.

३. भारताच्या कृषी निर्यातीत व्यापार वाढ करण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धत-**

प्रस्तूत शोध निबंधाच्या अभ्यासासाठी द्वितीय साधनसामुग्रीचा वापर करण्यात आला आहे. या संशोधन अभ्यासासाठी लागणाऱ्या साधन सामुग्रीमध्ये संदर्भ पुस्तके, शोधनिबंध, इंटरनेट इ.चा आधार घेण्यात आला आहे.तसेच संशोधनाच्या विविध पैलूंवर लक्ष ठेवल्यानंतर संशोधन अधिक चांगले व्हावे यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.प्रस्तूत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी २००५-०६ ते २०१३-१४ हा कालावधी विचारात घेण्यात आला आहे.

**तक्ता क्र. १**

**वर्ष २००५-०६ ते २०१३-१४ या कालावधीत कृषी क्षेत्राची निर्यात व त्यातील वाढीचा दर आणि कृषी निर्यातीचे एकुण निर्यातीशी प्रमाण**

(रु.कोटी)

| क्र.म | वर्ष | कृषीक्षेत्रातील निर्यात | एकुण निर्यात | कृषी निर्यातीचे एकुण निर्यातीशी % प्रमाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०२ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०३ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०४ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०५ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०६ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०७ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०८ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ०९ | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |

**स्त्रोत-** भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. देसाई व डॉ.सौ.भालेराव, १५ आवृत्ती, पान क्र. ११.२.

(टिप - कंसातील अंक मागील वर्षाच्या तुलनेत शेकडा बदल दर्शवितात.)

**निष्कर्ष**

१. २००५-०६ ते २०१३-१४ या दहा वर्षाच्या काळात देशाच्या एकुण कृषी निर्यातीत ६१,१९४ कोटी रुपयावरुन वरुन २,६८,४६९ को.रु पर्यंत (३३८%) ने वाढ घडून आली तर याच काळात देशाची एकुण निर्यातीत (३१५%) नी वाढ घडुन आली.

२. २००६-०७ व २००९-१० या वर्षी कृषी निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत सर्वात कमी वेगाने म्हणजेच सरासरी २ % दराने वाढ घडुन आली ; तर एकुण निर्यातीत २००९-१० यावर्षी मागील वर्षाच्या तुलनेत सर्वात कमी ०.५२% नी वाढ नोंदविण्यात आली

३. कृषी निर्यातीत २०११-१२ या वर्षी सर्वाधिक ६८.४२% ची तर एकुण निर्यातीत २०१०-११ या वर्षी सर्वाधिक ३५.२३ % ची वाढ नोंदविण्यात आली.

४. २००७-२००८(२६.६४%), २००९-२०१०(०१.८३%), २०११-१२ (६८.४२%), २०१२-१३(२३.६८%) यावर्षी देशाच्या कृषी निर्यातीतील वाढ ही देशाच्या एकुण निर्यातीतील वाढीपेक्षा तुलनेत जास्त होती.

५. २००६-०७, २००८-०९, २०१०-११ यावर्षी देशाच्या एकुण निर्यातीत कृषी निर्यातीच्या तुलनेत अधिक वाढ घडुन आली.

६.२०१३-१४ यावर्षी देशाची कृषी निर्यात व एकुण निर्यातीत सारख्याच प्रमाणात वाढ घडून आली.

७. २००५-०६ ते २०१३-१४ या काळात सरासरी कृषी निर्यातीचे एकुण निर्यातीशी प्रमाणसरासरी १२% दरम्यान होते.

**भारतीय कृषी निर्यातील अडथळे -**

देशांच्या एकुण निर्यातीत कृषी निर्यातीचे प्रमाण असमाधानकारक असल्याचे दिसून येते.कृषी निर्यात प्रमाण असमाधानकारक असण्याचा कारणांचा शोध घेतला असता काही कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. भारतीय शेती क्षेत्र हे निसर्गावर अवलंबुन असल्याने हवामान बदल, दुष्काळ व जास्त पाऊस या नैसर्गिक घटकांमुळे उत्पादनात घट होत असल्याने कृषी निर्यातीचे प्रमाण कमी आहे.

२. भारतात शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण यामूळे शेती क्षेत्रात अन्यआधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर मर्यादा येत असल्याने शेती क्षेत्रातुन केली जाणारी निर्यात घटत आहे.

३. कृषी निर्यात मालाच्या मागणीविषयी योग्य माहिती न



Scanned with OKEN Scanner

मिळाल्याने भारतीय कृषी मालाला योग्य बाजारपेठ मिळत नाही.

४. कृषी उत्पादन व निर्यातीसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत न पोहचल्याने भारतीय कृषी मालाची निर्यात समाधानकारक नाही.

५. कृषी निर्यात प्रक्रिया गुंतागुंतीची व खर्चिक असल्याने शेतकरी उत्पादित कृषी मालाची देशातच विक्री करतात.

६. विकसित देशातील आरोग्य विषयक निकष कठोर असल्याने भारतीय कृषीमाल निर्यात स्पर्धेत टिकत नाही.

७. कृषी निर्यातीसाठी अवश्यक सोयी सुविधांच्या कमतरतेमुळे भारतीय कृषी निर्यात समाधानकारक नाही.

८. दर्जेदार कृषी मालाची देशांतर्गत कमतरता असल्याने उत्पादित मालाला देशातच चांगली किंमत मिळत असल्याने हा माल देशातच विकला जातो.

९. भारतात साखर, गहु, कांदा , दूध द्राक्षे यांच्या निर्यातील राजकीय हस्तक्षेप होत असल्याने निर्यात योग्य माल देशातच पडून राहतो.

**उपाययोजना**

भारतीय कृषी क्षेत्राकडुन केली जाणारी निर्यातीत वाढ करण्यासाठी पुढील उपयोजना केल्या जाऊ शकतात.

१) भारतीय शेती क्षेत्राला शाश्वत पाणी, भांडवल, बाजरपेठ या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास शेती उत्पादन व निर्यातीत वाढ होईल.

२)आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ज्या देशात कृषी मालाला चांगली मागणी आहे; अशा देशातच निर्यात करण्यावर भर दिल्यास निर्यात्तीस प्रोत्साहन मिळेल.

३) कृषी मालाची निर्यात वाढविण्यासाठी नवीन परकीय बाजारपेठांचा शोध घेतल्यास शेतमाल निर्यातीस प्रोत्साहन मिळेल.

४) कृषी निर्यातीसाठी आवश्यक शेतमालप्रक्रिया, साठवणूक, वाहतूक व दळणवळण सोईच्या विकासावर भर देण्यात यावा.

५) कृषी मालाचे उत्पादन करताना शेतकऱ्यांकडूनदर्जेदार गुणवत्ता प्रधान शेतमाल उत्पादित केला जावा.

६) निर्यातक्षम कृषी मालाचे उत्पादन करताना आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक निकषांचे पालन केले जावे.

७)आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतमालाच्या किंमती जास्त असताना सरकारने निर्यातीला प्राधान्य दिल्यास कृषी क्षेत्राकडून केल्या जाणाऱ्या निर्यातीत वाढ घडुन येईल.

८) नाशवंत शेतमालाच्या निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या पॅकींग, साठवणूक, प्रक्रिया व शितगृहाच्या सुविधामध्ये वाढ केली जावी.

९) शेतीतील उत्पादन व निर्यातीसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहीती उत्पादक शेतकऱ्यापर्यंत पोहचवली जावी.

१०) कृषी माल निर्यातीत असलेली क्लिष्टता व गुंतागुत कमी केली जावी.

११) निवडक कृषी उत्पादनाबाबत असलेल्या राजकीय हस्ताक्षेप कमी केला जावा.

**समारोप** - स्वातंत्र्योत्तर काळात अर्थव्यवस्थेचा विकास प्रकियेत कृषी क्षेत्राने महत्वाची भूमिका बजावली आहे. देशांतर्गत किंमत स्थैर्य व परकीय चलनाची प्राप्ती या दृष्टीने शेती क्षेत्राची कामगीरी उल्लेखनीय आहे.आज देशाच्या एकुण निर्यातीत कृषी निर्यातीचे घटते प्रमाण कृषी क्षेत्राच्या विकासात एक प्रमुख अडथळा ठरत आहे. यावर उपाय म्हणुन कृषी निर्यातीबाबत असलेल्या देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाय योजल्यास भविष्यात देशाकडुन केल्या जाणाऱ्या कृषी निर्यातीत भरघोस वाढ होऊन त्याचा देशाच्या आर्थिक विकासासाठी निश्चितच फायदा होईल.

**संदर्भ-**

१ कै.डॉ.स.श्री.देसाई व डॉ.सौ. निर्मला भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे,२०१७

२ मिश्रा व पुरी, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालय पब्लिकेशन, नवी दिल्ली,२०१७

३ दत्त व सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, एस.चान्द पब्लिकेशन, नवी दिल्ली,२०१६.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner

ISSN 2394-5303

# Printing Area®

Issue-60, Vol-03 December 2019

Peer Reviewed International Refereed Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned by TapScanner

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | December 2019, Issue-60, Vol-03 | 01

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

**December 2019, Issue-60, Vol-03**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by TapScanner

15) महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना
प्रा. डॉ. बाभुळगावकर किशन सत्ताजी, हिंगोली ||72

16) जीवन नाट्याचा आविष्कार : स्त्री गीत
डॉ. जयदेवी पवार, लातूर ||75

17) कृषिजीवनाचे वास्तव आविष्कृत करणारी ग्रामीण कविता
प्रा.डॉ. सदाशिव सरकटे, गढी ||78

18) महात्मा बसवेश्वर आणि काही संत : एक साम्य
डॉ. राजीव यशवंते, पूर्णा ||82

19) रा.रं.बोराडे यांच्या साहित्यामधील ग्रामीण जीवन
डॉ. एम. पी. खेडेकर, वाशिम ||85

20) भारतीय संगीतातील कंठसंस्काराचे महत्व
डॉ. स्नेहल दत्तात्रय शेंबेकर, अकोला ||88

21) इंदिरा संत यांच्या कविता संग्रहातील कवितांचा विचार
डॉ. देवेंद्र शेषराव तातोडे, नागपूर ||90

22) अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया: राजकीय पक्षांची वाटचाल (१९५० ते १९९०) - एक अभ्यास
श्री. जिजाभाऊ सिताराम घुले, डॉ. संजय बापुराव गायकवाड ||92

23) अॅट्रोसिटी कायदा आणि सामाजिक न्याय
प्रा.डॉ.सौ.अरूंधती पाटील, चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे, बीड ||99

24) महानुभाव संप्रदाय तत्त्वज्ञान व आचारपद्धती काल व आज
प्रा. नरसिंग कदम, उदगीर ||104

25) वसंत आबाजी डहाके : जीवन आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्व
कु. जोत्सना राऊत ||106

26) "मंजुल भगत की कहानियों में व्यक्त स्त्री चेतना"
डॉ. नागराज उत्तमराव मुळे, लातूर ||109

27) राजस्थान में शिक्षा के विकास में ईसाई मिशनरियों का योगदान
अमनदीप, जयपुर ||111

28) वसुधैव कुटुम्बकम्
प्रा. रामसिंह एन. डोडिया, गिर सोमनाथ ||115




www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Scanned by TapScanner

घेतला. ज्या निराकार सृष्टीत इंदिराबाईची सारी कविता साकारली त्या सृष्टीचे पडसाद 'निराकार' या कवितासंग्रहात इंदिराबाईला खुणावतात. हिंदोळणारे उन्हाचे लाडके कवडसे कवयित्रीच्या पायावरुन लहरुन जातात. निराकार विश्वाच्या पलिकडे असलेल्या निराकाराकडील संभाव्य वाटेवरुन चालतांना हे मन उत्सुकतेने बहरते आणि निर्गम झाल्याचे दिसते. अशी चित्रे या कवितासंग्रहात कमी दिसून येतात. हा कवितासंग्रह म्हणजे या क्षेत्रातल्या कवयित्रीचा मृत्यू लांबवल्याचा प्रकार आहे. लय, वेल्हाळ सारख्या अगदी मोजक्याच रचना सोडल्या तर या कवितासंग्रहातील रचना इंदिराबाईना कवयित्री म्हणून लाभलेल्या प्रसिध्दीमुळे फारशा प्रमाणात भर घालणाऱ्या नव्हत्या.

इंदिराबाईनि मागणी तसा पुरवठा अशा कविता लिहल्या नाही. तर भाव, प्रेम, विरह, निसर्ग अशा कविता भरमसाठ प्रमाणात लिहल्या असून अभिव्यक्तीचा वेगळेपणा असला तरी प्रेम आणि विरह, आशय इंदिराबाईच्या कवितासंग्रहातील कवितेत सापडतो.

❑❑❑

**22**

# अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया: राजकीय पक्षांची वाटचाल (१९५० ते १९९०) - एक अभ्यास

**श्री. जिजाभाऊ सिताराम घुले**
संशोधक, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड, संशोधन केंद्र - पिपल्स कॉलेज नांदेड,

**डॉ. संजय बापुराव गायकवाड**
मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमतनगर

**********

**१.१ प्रस्तावना :-**

महाराष्ट्राच्या राजकारणात राजकीय दृष्टया जागृत असणारा जिल्हा म्हणून अहमदनगर जिल्ह्याकडे पाहिले जाते. हा जिल्हा तसा कम्युनिष्ठ विचारसरणीचा जिल्हा म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात ओळखला जातो. महाराष्ट्राच्या राजकारणाला दिशा देण्याचे काम या जिल्ह्याने केले आहे. जिल्ह्याच्या राजकारणात विविध राजकीय पक्ष सक्रिय असतांना दिसतात. सुरुवातीच्या काळात जिल्ह्यात कम्युनिष्ठ पक्षाचे म्हणजेच डाव्या विचारसरणीचे वर्चस्व होते. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणामुळे कम्युनिष्ठ पक्षातील अनेक मातब्बर नेते कॉंग्रेस पक्षात सामील झाले व जिल्ह्यात हळूहळू कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव वाढत गेला. १९९० नंतर मात्र कॉंग्रेस पक्षाबरोबरच उजव्या विचारसरणीच्या शिवसेना भाजप या पक्षांचाही प्रभाव वाढत गेला. आज जिल्ह्याच्या राजकारणात भाजपचा प्रभाव वाढलेला दिसून येतो.

**१.२ संशोधनाची उद्दिष्टे :-**

संशोधन संबंधीत विषयाच्या संशोधनासाठी उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. अहमदनगर जिल्ह्यात डाव्या पक्षांचा प्रभाव कमी होण्याच्या कारणांचा शोध घेणे.
२. जिल्ह्यातील विधानसभा व लोकसभा निवडणूकांच्या माध्यमातून राजकीय प्रक्रियेचा व पक्षीय सत्ता संघर्षाचा अभ्यास करणे.



Scanned by TapScanner

३. जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा प्रभाव वाढण्यामागील कारणांचा अभ्यास करणे.

४. अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय पक्षाच्या वाटचालीच्या व सत्तासंघर्षातून राजकीय प्रकियेचा अभ्यास करणे.

**१.३ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

प्रस्तुत विषय हा अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या सत्ता संघर्षाचा अभ्यासाचा असून जिल्ह्यात डाव्या पक्षाचा प्रभाव कमी होऊन काँग्रेसचा प्रभाव वाढण्या मागील कारणांचा अभ्यास करणारा आहे.

सदरचा अभ्यास अहमदनगर जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभा निवडणूकांचाच आधार घेण्यात आला आहे. अहमदनगर जिल्ह्यात अनेक राजकीय पक्ष कार्यरत आहेत. परंतू जिल्ह्याच्या तत्कालीन राजकारणाचा विचार करता कम्युनिस्ट व काँग्रेस हे पक्ष प्रभावशाली असलेले दिसून येतात त्यामुळे फक्त त्यांच्याच वाटचालीचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच अहमदनगर जिल्हा या भौगोलिक क्षेत्रापुरताच मर्यादित आहे. सदरच्या अभ्यासात स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारातील निवडणूकांच्या व पक्षीय सत्तास्पर्धेचा अभ्यास केलेला नाही.

**१.४ संशोधनाची गरज व महत्त्व :-**

अहमदनगर जिल्ह्यात डाव्या विचारसरणीस मानणारा जिल्हा म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात ओळखला जात होता. स्वातंत्र्योत्तर काळापासूनच जिल्ह्यात कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव होता. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक राजकीय नेत्यांना या जिल्ह्यात स्थानबद्ध करण्यात आले होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव अनेकांवर पडला व त्यातूनच साम्यवाद या जिल्ह्यात पसरला डाव्या विचारसरणीचे अनेक तरुण कार्यकर्ते उभे राहिले. व त्यातून कम्युनिस्टांचे राजकारण जिल्ह्यात सुरु झाले. राज्यात सर्वप्रथम काँग्रेससमोर आव्हान अहमदनगर जिल्ह्यातूनच उभे राहिले. डाव्या विचारसरणीच्या नेतृत्वाने राज्याच्या राजकारणात महत्वपूर्ण भूमिका बजावली असे असतांनाही १९७० नंतर मात्र डाव्या पक्षांचा प्रभाव कमी झाल्याचे लोकसभा व विधानसभा निवडणूकांवरुन दिसून येते. याच काळात जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा प्रभाव वाढत गेला. हा प्रभाव का वाढला याचा शोध घेण्यात येणार आहे.

सदरच्या अभ्यासातून जिल्ह्यात डाव्यांचा प्रभाव व महत्व कसे होते, ते का कमी झाले याचे ज्ञान जिल्ह्याच्या राजकारणाचा अभ्यास करणारे राजकीय विश्लेषक, विचारवंत व संशोधक यांना होणार आहे. तसेच झालेल्या वैचारिक बदलामागील कारणमिमांसा स्पष्ट होणार आहे. जिल्हा पातळीवरील पक्षीय राजकारण, सत्ता संघर्ष कशा प्रकारे घडून येतो याची माहिती उपलब्ध होणार आहे. इत्यादी महत्त्वाच्या विषयाला समोर ठेऊन संशोधनकार्य निश्चित केले आहे.

**१.५ संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक व विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यासाठी शासकीय दस्ताऐवज वर्तमानपत्रातील बातम्या, विविध ग्रंथ, निवडणूक आयोगाचे अहवाल, बातमी इ. दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**१.६ विश्लेषणसाठी अर्थनिर्वचन :**

संशोधन विषयाचे कार्य केल्यानंतर प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संशोधन विषयाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

**१.७ संदर्भाविषयी टिप :-**

संशोधनासाठी संदर्भ देताना इन टेक्स (in - Text) ही संदर्भ पध्दती वापरण्यात आली आहे. यानुसार सर्व संदर्भ शेवटी संदर्भ सूचित देण्यात आले आहे.

**२. अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय पक्ष :-**

स्वातंत्र्योत्तर काळापासूनच जिल्ह्यात साम्यवादी व समाजवादी विचारसरणीस मानणारे अनेक पक्ष जिल्ह्यात कार्यरत होते. त्यांची वाटचाल व निवडणूकीतील यश अपयश, सत्ता संघर्ष पुढील प्रमाणे सांगता येईल. अहमदनगर जिल्ह्यात अनेक राजकीय पक्ष कार्यरत आहेत. परंतू जिल्ह्याच्या तत्कालीन राजकारणाचा विचार करता कम्युनिस्ट पक्ष व काँग्रेस हे पक्ष प्रभावशाली असलेले दिसून येतात. त्याची वाटचाल व निवडणूकीतील यशापशाचा आढावा पुढील प्रमाणे.

**२.१ डावे पक्ष :-**

१५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाला. त्यावेळी अहमदनगर जिल्ह्यात डाव्या विचारसरणीचा प्रभाव होता. त्यात शेतकरी कामगार पक्ष, कामगार किसान पक्ष, कम्युनिस्ट पक्ष असे डावे विचारसरणीस मानणारे पक्ष जिल्ह्यात कार्यरत होते.

**२.१.१ शेतकरी कामगार पक्ष :-**

महाराष्ट्राच्या राजकारणात खऱ्या अर्थाने काँग्रेस पक्षाचा राजकीय विरोधक म्हणून मराठी मातीत उभा राहिलेला पहिला प्रादेशिक पक्ष म्हणजे शेतकरी कामगार पक्ष होय. साम्यवादी व समाजवादी विचारसरणीचा प्रभाव असणाऱ्या केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशिदास जाधव हे काँग्रेस मध्ये आले. व त्यांनी काँग्रेस पक्षाच्या चळवळीत शेतकरी आणि कामगार यांनी सहभागी व्हावे म्हणून प्रयत्न केले. मात्र १९४५ नंतर प्रांतिक विधीमंडळाच्या राजकारणात वैचारिक मतभेद होऊन ३ ऑगस्ट १९४८ रोजी हे नेते बाहेर पडले. व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.



Scanned by TapScanner

काँग्रेसमधील नाराजगट सत्यशोधक विचारांना मानणारा मराठा समाजातील मोठा गट तसेच कम्युनिस्ट व समाजवादी पक्षांतला असंतुष्ट गट या तीन गटांच्या एकत्र येण्यामुळे शेकपला राज्यातील बहुतांश भागामधून पाठिंबा मिळाला. शेकपच्या स्थापनेत महत्वपुर्ण भूमिका असणाऱ्या दत्ता देशमुख, पी.के.भापकर हे अहमदनगर जिल्ह्यातील असल्यामुळे जिल्ह्यातही या पक्षाचा प्रभाव वाढला. पक्षांतील दत्ता देशमुख व काकासाहेब वाघ यांनी बाहेर पडून किसान कामगार पक्षाची स्थापना केली. दत्ता देशमुख हे अहमदनगर जिल्ह्यातील असल्यामुळे या पक्षाचा प्रभाव जिल्ह्यात वाढला. १९५२ च्या निवडणूकीत कि.का.प.ला दोन जागा मिळाल्या. काँग्रेस पक्षाला पर्याय म्हणून कि.का.प.ने महत्वाची भूमिका बजावली.

**२.१.२. कम्युनिस्ट पक्ष :-**

भारताच्या राष्ट्रीय राजकारणात १९२५ साली भारतीय कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला. या पक्षाने कामगारांच्या संघटना तयार करुन कामगारांचे अनेक लढे लढले. काँग्रेस पक्षानंतर दुसरा मोठा राष्ट्रीय पक्ष बनण्यासाठी या पक्षाने प्रयत्न केला. मात्र वैचारिक मतभेदामुळे पक्ष फूट होऊन त्याचा परिणाम पक्षाच्या यशपयशावर झाला. शेतकरी, कष्टकरी, कामगार, शोषित यांचे लढे जनचळवळीच्या माध्यमातून उभे करत शेकपच्या नेत्यांनी सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गोवा मुक्ती संग्राम या लढयांमध्येही डाव्या विचारसरणीने महत्त्वाची भूमिका बजावली. अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात सुरवातीच्या काळात कम्युनिस्ट पक्षाचा मोठा दबदबा होता. जिल्ह्यात आण्णासाहेब शिंदे, पी.बी.कडू पाटील, भाऊसाहेब थोरात, चंद्रभान आठरे पाटील, भास्कर औटी, दत्ता देशमुख, शंकरराव काळे, आबासाहेब निंबाळकर, विनायकराव ताकटे इत्यादी कार्यकर्ते पक्षाचे कार्य करत होते. (ग्रामवेद पृष्ठ क्रं.१४० ते १४१) संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येत संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. व निवडणूका लढविल्या. १९५७ च्या विधानसभा व लोकसभा निवडणूकीत समितीला मोठे यश मिळाले. विधानसभेच्या १२ पैकी ११ जागांवर समितीला विजय मिळाला. तर लोकसभेच्याही २ जागा जिंकल्या. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी विरोधी पक्षातील अनेक कार्यकर्त्यांना बेरजेचे राजकारण करत सत्ता प्रलोभन दाखवत काँग्रेस पक्षात सामिल करुन घेतले. जिल्ह्यातही कम्युनिस्ट पक्षातील आण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, चंद्रभान आठरे, शंकरराव काळे, आबासाहेब निबाळकर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने जिल्ह्याच्या राजकारणात कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव काही प्रमाणात कमी झाला. १९६२ च्या विधानसभा निवडणूकीत समितीकडे महत्वाचे मुद्दे नसल्यामुळे काँग्रेसेत्तर पक्षात फूट पडली. या निवडणूकीत जिल्ह्या त समितीला केवळ २ जागा मिळाल्या. लोकसभेलाही समितीचा पराभव झाला. १९६७ च्या निवडणूकीत मुख्य लढत काँग्रेस व कम्युनिस्ट पक्षात झाली. मात्र या निवडणूकीतही पक्षाला केवळ विधानसभेची १ जागा मिळाली. व लोकसभेच्या दोन्ही जागांवर पक्ष पराभूत झाला. १९७२ च्या विधानसभा निवडणूकीत २ जागा १९७८ च्या निवडणूकीत १ जागा कम्युनिस्ट पक्षास मिळाली. देश पातळीवर व राज्य पातळीवर राजकारणाचा परिणाम म्हणून कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव कमी होत गेला. त्याचा परिणाम जिल्ह्याच्या राजकारणावर झाला. सर्वात प्रभावी पक्ष असणारा कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव हा आता खूपच कमी झाला. मात्र असे म्हणता येईल की, १९८० पर्यंत काँग्रेस पक्षाचा मुख्य विरोधक म्हणून डाव्या पक्षांनी राजकारण केल्याचे दिसून येते.

**डाव्या पक्षांची लोकसभा निवडणूकीतील कामगिरी**

| वर्ष | एकुण जागा | लढवलेल्या जागा | जिंकलेल्या जागा |
|---|---|---|---|
| १९५२ | २ | २ (कि.का.प.) | ०० |
| १९५७ | २ | २ (समिती) | ०२ |
| १९६२ | २ | २ (समिती) | ०० |
| १९६७ | २ | २ (कम्युनिस्ट) | ०० |
| १९७१ | २ | १ (कम्युनिस्ट) | ०० |
| १९७७ | २ | १ (भाकप) | ०० |
| १९८० | २ | ०० | ०० |
| १९८४ | २ | ०० | ०० |
| १९८९ | २ | ०१ (भाकप) | ०० |

स्त्रोत - निवडणूक आयोग भारत सरकार, लोकसभा निवडणूक अहवाल सन १९५२ ते १९८९

**डाव्या पक्षांची विधानसभा निवडणूकीतील कामगिरी**

| निवडणूक वर्ष | एकुण जागा | लढवलेल्या जागा | जिंकलेल्या जागा |
|---|---|---|---|
| १९५२ | १० | १० (कि.का.प.) | ०२ (कि.का.प.) |
| १९५७ | १२ | १२ (समिती) | ११ (समिती) |
| १९६२ | १२ | ११ (कम्युनिस्ट व समिती) | ०२ (समिती) |
| १९६७ | १२ | ९ (कम्युनिस्ट). | ०१ (कम्युनिस्ट) |
| १९७२ | १२ | ५ (कम्युनिस्ट) | ०२ (कम्युनिस्ट) |
| १९७८ | १३ | ७ (कम्युनिस्ट) | ०१ (कम्युनिस्ट) |
| १९८० | १३ | ३ (कम्युनिस्ट) | ०१ (कम्युनिस्ट) |
| १९८५ | १३ | ४ (कम्युनिस्ट) | ०० |

स्त्रोत - निवडणूक आयोग भारत सरकार महाराष्ट्र विधानसभा अहवाल सन १९५२ ते १९८५

**२.२ समाजवादी विचारसरणीचे पक्ष :-**

भारताच्या राजकीय पटलावर १९३४ साली जय प्रकाश नारायण, नरेंद्र देव यासारख्या नेत्यांनी समाजवादाची मांडणी केली. काँग्रेसमध्येच राहून समाजवादी विचारांचा एक गट तयार केला. नंतरच्या काळात वैचारिक मतभेद झाल्याने समाजवादी गट काँग्रेसमधून बाहेर पडला. व त्यांनी १९४८ मध्ये समाजवादी पक्षाची स्थापना केली. मात्र अंतर्गत वाद, वैचारिक मतभेद, राजकीय धूर्तपणाचा



Scanned by TapScanner

अभाव यामुळे पक्षात वारंवार फूट पडत गेली. व त्यामुळे समाजवादयांचा प्रभाव राजकारणात फारसा टिकला नाही. प्रजा समाजवादी, समाजवादी (लोहिया गट) संयुक्त समाजवादी, प्रजा समाजवादी असे वेगवेगळे पक्ष निर्माण होत राहिले. १९७५ मध्ये जनता पक्षाच्या माध्यमातून आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न समाजवादयांनी केला. परंतू त्यास फारसे यश आले नाही. संयुक्त जनतादल, राष्ट्रीय जनतादल, समाजवादी पक्ष, धर्मनिरपेक्ष जनतादल असे समाजवादी पक्षाचे तुकडे झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणात समाजवादी पक्षाला फारसे यश आले नाही. पक्ष फूटीमुळे राज्यात समाजवादी पक्षाचे राजकारण उभे राहू शकले नाही. जिल्ह्याच्या राजकारणातही हा पक्ष फारसा प्रभाव पाडू शकला नाही. १९७७ मध्ये भालोदने लोकसभेची १ जागा लढवली. तर १९८४ ते १९८९ मध्ये जनता पक्षाने लोकसभेची जागा लढवली मात्र त्यास त्याला यश आले नाही. विधानसभा निवडणूकींचा विचार करता १९७८ मध्ये जनता पक्षास दोन जागांवर विजय मिळाला तर अनेक मतदारसंघात जनता पक्षास दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. १९८० विधानसभा निवडणूकीत जनता पक्षास २ जागा मिळाल्या. तर १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. १९८५ च्या विधानसभा निवडणूकीत जनता पक्षास एक जागा मिळाली. तर १९९० च्या विधानसभा निवडणूकीत जनता दलास २ जागा मिळाल्या. जिल्ह्याच्या राजकारणात हा पक्ष फारसा प्रभावी राहिला नाही. बबनराव ढाकणे यांच्या रुपाने समाजवादयांस जिल्ह्यातून प्रभावी व अभ्यासू नेतृत्व मिळाले होते. मात्र पुढील काळात समाजवादयांचा प्रभाव कमी झाल्यामुळे ते जिल्ह्याच्या राजकारणात फारसा प्रभाव पाडू शकले नाही.

**२.३ काँग्रेस पक्ष :-**

अहमदनगर जिल्ह्याच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचे स्थान अतिशय वैशिष्टयपुर्ण असे आहे. स्वातंत्र्यपुर्व काळापासून हा पक्ष जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय होता. लक्ष्मणराव कोळसे पाटील, बाजीराव कोते पाटील, अच्युतराव व रावसाहेब पटवर्धन, बाळासाहेब भारदे, रामभाऊ गिरमे, के.बी. रोहमारे, स्वामी सहजानंद भारती, बाळासाहेब भगत, शंकरराव काळे, रामराव चव्हाण, बाबुराव तनपुरे, बाळासाहेब विखे पाटील, आबासाहेब निंबाळकर, रामराव व गोविंदराव आदिक बंधू हे पक्षाचे कार्यकर्ते होते.

१९५२ ते १९९० या काळातील विधानसभा व लोकसभा निवडणूकांचा विचार करता असे दिसून येते की, १९५७ चा अपवाद वगळता १९९० पर्यंत जिल्ह्याच्या राजकारणावर काँग्रेस पक्षाचे निर्वीवाद वर्चस्व होते. त्याचप्रमाणे काँग्रेस पक्षांतर्गत विविध गट तट होते. सुरुवातीच्या काळात स्वामी सहजानंद भारती व बाळासाहेब भारदे यांचे गट होते मात्र काँग्रेसचा जिल्ह्यात प्रभाव असल्याने या गटातटाच्या राजकारणाचा काँग्रेसच्या कामगिरीवर प्रभाव पडला नाही. १९७० नंतर काँग्रेसच्या नेतृत्वात हळुहळू बदल होण्यास सुरुवात झाली. पक्षांतर्गत दोन सत्ताकेंद्रे तयार झाली. त्यातून काँगेस विरोधात बंडखोर काँग्रेस असा एक नवीन राजकीय संघर्षाचा नमुना पाहण्यास मिळाला. (ग्रामवेद पृ.क्रं.१४३-१४६)

स्वातंत्र्य आंदोलनातून पुढे आलेली पिढी मागे पडली व जिल्हा काँग्रेसमध्ये बाळासाहेब विखे पाटील, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, भाऊसाहेब थोरात, यशवंतराव गडाख यांचे वर्चस्व वाढले. १९७० नंतर जिल्ह्याच्या राजकारणात विशेषत: काँग्रेस पक्षात घराणेशाही, सोयरेशाही निर्माण झाली. याबरोबरच नात्यागोत्याचे राजकारण सुरु झाले. त्यामुळे पक्षांतर्गत गट - तटाची स्पर्धा तीव्र झाली व काँग्रेसच काँग्रेसचा पराभव करु लागली. त्याचा परिणाम निवडणूकीतील कामगिरीवर झाला व जिल्ह्यातून हळुहळू काँग्रेसचा प्रभाव कमी होण्यास सुरुवात झाली.

१९९० नंतर जिल्ह्यात राष्ट्रीय व राज्य पातळीवरील राजकारणाचा परिणाम म्हणून काँग्रेसला शह देणारी शिवसेना भाजपा युतीचा शिरकाव झाला. त्यास काँग्रेस अंतर्गत गटबाजीने पोषक वातावरण तयार करुन दिले.

**काँग्रेसची लोकसभा निवडणूकीतील कामगिरी**

| वर्ष | एकुण जागा | लढवलेल्या जागा | जिंकलेल्या जागा |
|---|---|---|---|
| १९५२ | २ | २ | २ |
| १९५७ | २ | २ | ० |
| १९६२ | २ | २ | २ |
| १९६७ | २ | २ | २ |
| १९७१ | २ | २ | २ |
| १९७७ | २ | २ | २ |
| १९८० | २ | २ | २ |
| १९८४ | २ | २ | २ |
| १९८९ | २ | २ | २ |

स्त्रोत - निवडणूक आयोग भारत सरकार, लोकसभा निवडणूक अहवाल सन १९५२ ते १९८९

**विधानसभा निवडणूकीतील कामगिरी**

| निवडणूक वर्ष | एकुण जागा | लढवलेल्या जागा | जिंकलेल्या जागा |
|---|---|---|---|
| १९५२ | १० | १० | ०८ |
| १९५७ | १२ | ११ | ०१ |
| १९६२ | १२ | १२ | १० |
| १९६७ | १२ | १२ | १० |
| १९७२ | १२ | १२ | ०६ |
| १९७८ | १३ | १२ | ०९ |
| १९८० | १३ | १२ | ०९ |
| १९८५ | १३ | १३ | ०८ |
| १९९० | १३ | १३ | ०९ |

स्त्रोत - निवडणूक आयोग भारत सरकार महाराष्ट्र विधानसभा अहवाल सन १९५२ ते १९९०



Scanned by TapScanner

**२.४ समाजवादी काँग्रेस :-**

महाराष्ट्रातील काँग्रेसमधील दीर्घकाळ मराठा नेतृत्वाच्या राजकारणानंतर १९७० च्या दशकापासून संघटनातंर्गत सत्तास्पर्धा तीव्र झाली त्यातून मुख्यत: यशवंतराव चव्हाणाच्या बेरजेच्या राजकारणाच्या प्रारुपानुसार राजकारण करणाऱ्या गटांना काँग्रेसमधून बाहेर पडावे लागले. मराठा समाजाची ऐतिहासिक वाटचाल सत्ताकांक्षा, आणि त्याला मिळालेली आव्हाने यांतून १९७८ मध्ये शरद पवार हे काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी समाजवादी काँग्रेस या पक्षाची स्थापना केली. शरद पवार यांचे नेतृत्व मानणारे जिल्ह्यातील अनेक नेते एस काँग्रेसमध्ये सामील झाले. तेव्हापासून जिल्ह्याच्या राजकारणात बरेच अस्थैर्य निर्माण झाले. पक्षापेक्षा नेत्यांच्या व्यक्तीगट बळाला महत्व प्राप्त झाले. १९८० च्या विधानसभा निवडणूकीत दोन्ही काँग्रेसमध्ये मुख्य लढत झाली. अनेक महत्त्वाच्या मतदारसंघात काँग्रेसच्या या दुसऱ्या गटाला मते मिळाली. या काळात इतर पक्षातील सत्ता स्पर्धेपेक्षा काँग्रेस व काँग्रेस एस यामध्येच मुख्य लढती झाल्या. १९८५ च्या विधानसभा निवडणूकीत एस काँग्रेसला दोन जागा मिळाल्या. नंतर काळात शरद पवारांनी लोकसभा निवडणूकी अगोदर एस काँग्रेस आय मध्ये विलीन केले. त्यामुळे शरद पवारांबरोबर गेलेले जिल्ह्यातील दादाभाऊ कळमकर, विजय औटी, दौलतराव पवार, ज्ञानदेव पठारे, रावसाहेब म्हस्के, रामदास धुमाळ, संभाजीराव काळे, अशोक बाबर इत्यादी नेते पुन्हा काँग्रेसमध्ये गेले.

**२.५ शिवसेना :-**

महाराष्ट्राच्या पक्ष पद्धतीमध्ये जे स्थित्यंतर घडून आले त्याला शिवसेना या पक्षाने महत्वाचा हातभार लावला आहे. मराठी माणसांवरील अन्यायाचे निवारण करण्याकरिता लढाऊ संघटना म्हणून शिवसेना या राजकीय संघटनेची स्थापना झाली. १९८० नंतर मुंबई महानगर पालिकेच्या राजकारणात शिवसेनेने रस घ्यायला सुरुवात केली व हळुहळु शिवसेनेचा प्रभाव मुंबई, मुंबई उपनगरे व महाराष्ट्रात वाढू लागला. बाळासाहेब ठाकरे यांनी १९८५ नंतर राज्याच्या ग्रामीण भागात लक्ष देण्यास ग्रामीण भागात लक्ष देण्यास सुरुवात केली हिंदूत्वाच्या आधारावर भाजपाबरोबर युती केली व १९८९ व १९९१ च्या लोकसभा निवडणुका लढवल्या १९९० च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला चांगले यश मिळाले. व काँग्रेसला प्रमुख विरोधी पर्याय म्हणून शिवसेना पक्ष पुढे आला. (चोरमारे विजय, संपा.महाराष्ट्राचे राजकारण: नवे संदर्भ पृ.क्रं.७२, ७३)

अहमदनगर जिल्ह्याचा विचार करता १९८० ते १९९० च्या काळात शिवसेना विविध निवडणुकांमध्ये आपले उमेदवार उभे करत होती. मात्र फारशे यश मिळत नव्हते. १९९० मध्ये नगर दक्षिण विधानसभा मतदार संघातून अनिल राठोड यांच्या रुपाने शिवसेनेस यश मिळाले. १९९० नंतर जिल्ह्यात काँग्रेसला पर्याय म्हणून जनता शिवसेनेकडे पाहू लागली जिल्ह्यातील तरुण मतदार शिवसेनेकडे वळला. शिवसेनेने गांव तेथे शाखा हे अभियान राबवून गांव वाडया व वस्त्यांवर शिवसेनेच्या शाखा सुरु केल्या. तसेच जिल्ह्यातील पाणी, कर्ज माफी, दुष्काळ, बेरोजगारी, विज पुरवठा इत्यादी प्रश्नांवर आक्रमक आंदोलने केली. त्यामुळे जिल्ह्यात हळूहळू शिवसेनेचा प्रभाव वाढत गेला.

**२.६ भाजपा :-** १९८० मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष या नावाने जनसंघाची फेरस्थापना करण्यात आली. १९८९ मध्ये महाराष्ट्रात हिंदूत्वाच्या आधारे भाजप शिवसेनेशी युती झाली व भाजपने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिरकाव करण्यास सुरुवात केली. (पळशिकर कुलकर्णी, संपा. २००७ सत्तासंघर्ष, पृ.क्रं.९९, १००) महाराष्ट्राबरोबरच जिल्ह्याच्या राजकारणातही भाजपचा प्रभाव वाढण्यास सुरुवात झाली. १९९० च्या विधानसभा निवडणूकीत अनेक मतदार संघात भाजपने चांगली मते मिळवल्याचे निवडणूक निकालांवरुन दिसून येते.

**३. विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

१९५० ते १९९० पर्यंतच्या राजकीय पक्षांच्या वाटचालीचा अभ्यास करताना विविध ग्रंथ, वर्तमानपत्रातील बातम्या शासकीय दस्ताऐवज निवडणूक अहवाल यांचा अभ्यास केल्यानंतर काही संमोर आली त्यांचा दशक निहाय आढावा पुढीलप्रमाणे:

सन १९५० ते १९६० या दशकांतील राजकीय पक्षांचा व निवडणूक निकालांचा विचार करता असे दिसून येते की, जिल्ह्यात डाव्या विचारसरणीचा प्रभाव होता. पहिल्या सार्वजनिक निवडणुकीस काँग्रेसला १० पैकी ८ जागा मिळाल्या व लोकसभेच्याही दोन जागांवर विजय मिळाला. काँग्रेस पक्षाचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान हे या निवडणुकीतील यशाचे महत्वाचे कारण होते. यावेळी काँग्रेस अंतर्गत दोन गट होते मात्र गटबाजीचा १९५२ च्या निवडणुकीवर परिणाम झाला नाही.

काँग्रेसच्या प्रभावाला सर्वात प्रथम आव्हान अहमदनगर जिल्ह्यातुन १९५७ च्या निवडणुकीत मिळाले. या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाची पार्श्वभुमी होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत काँग्रेसतर सर्व पक्ष सहभागी झाल्याने एक प्रकार "लाट" निर्माण झाली राज्याच्या राजकारणाबरोबरच जिल्ह्याच्या राजकारणातही यांचा परिणाम झाला. जिल्ह्यात काँग्रेसला अपयश आले. एकुणच स्वातंत्र्यनंतरच्या पहील्या दशकात जिल्ह्यात डाव्या व समाजवादी पक्षांनी काँग्रेससमोर आव्हान उभे केले.



Scanned by TapScanner

१९६० ते १९७० च्या दशकाचा विचार करता जिल्ह्यात अनेक महत्त्वपुर्ण घडामोडी घडुन आल्या. यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणाच्य प्रारुपामुळ डाव्या पक्षांतील अनेक मातब्बर नेते कॉंग्रेसमध्ये १९६२ च्या निवडणुकी आगोदर आले. विठ्ठलराव विखे, बाळासाहेब विखे, अण्णासाहेब शिंदे, शंकरराव काळे, भाऊसाहेब थोरात यांच्या सारखे नेते कॉंग्रेसमध्ये गेले तसेच बाळासाहेब भारदे यांनी जिल्ह्यात कॉंग्रेसची भक्कमपणे बांधणी केली विधानसभेच्या निवडणुकीस याचा सकारात्मक परिणाम झाला. १२ पैकी १० जागा व लोकसभेच्या दोन्ही जागा मिळवुन आपले वर्चस्व सिद्ध केले. दरम्यानच्या काळात जिल्हा परिषद व पंचायत समितीची स्थापना झाली. या निवडणुकीतुन कॉंग्रेस पक्षाला नव नेतृत्व मिळण्यास मदत झाली. जिल्हा परिषद, पंचायत समितीतून साहेबराव पाटील, शंकरराव काळे, द.वि.पाटील, वसंतराव खंडागळे, जगन्नाथ बनकर, एकनाथराव तथा बाळासाहेब विखे, काशिनाथ खिलारी, बाजीराव पाटील यांचे नेतृत्व पुढे आले.

सहकार क्षेत्राचा विस्तार या दशकात घडून आला. जिल्हा सहकारी बँक, सहकारी साखर कारखाने, सहकारी सोसायटया यातून नेतृत्व विकसीत होण्यास मदत झाली. तसेच जनतेचा राजकीय सहभागही वाढला. सहकाराचा विकास घडून आल्याने शेतकऱ्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. या दशकातही जिल्ह्याच्या राजकारणात कॉंग्रेस अंतर्गत भारदे-रोहमारे आणि निंबाळकर गट होता. या पक्षांतर्गत गटबाजीचा प्रभाव १९६७ च्या निवडणूकीवर झाला. पक्षांतर्गत गटबाजीमुळे कॉंग्रेसला काही ठिकाणी बंडखोरीचा सामना करावा लागला. या निवडणूकीत विधानसभेच्या १२ पैकी १० जागांवर कॉंग्रेसला यश मिळाले. परंतू कॉंग्रेस पक्षातंर्गत बंडखोरीचा सामना करावा लागला. लोकसभेच्या दोन्ही जागांवर कॉंग्रेसला विजय मिळाला. अंतर्गत गटबाजीमुळे शिर्डीची जागा कॉंग्रेसने गमावली. या दशकात कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव वाढला मात्र त्याच वेळी पक्षांतर्गत सत्ता स्पर्धा तीव्र झाली. तसेच विरोधी डाव्या पक्षांचा प्रभाव कमी होत गेला.

१९८० ते १९९० च्या दशकाचा विचार करता या काळात कॉंग्रेसचे नेतृत्व दुसऱ्या फळीतील नेत्यांच्या ताब्यात गेले. १९७१ च्या लोकसभा निवडणूक पुढील काळात जिल्ह्याच्या राजकारणावर दीर्घकाळ परिणाम करणारी ठरली. या निवडणूकीत प्रथमच एकनाथराव उर्फ बाळासाहेब विखे यांनी लोकसभा निवडणूक लवढली व विजय मिळवला. पुढे दीर्घकाळ जिल्ह्या च्या राजकारणावर विखे गटाचा प्रभाव राहिला. तसेच पक्षांतर्गत सत्तास्पर्धा तीव्र झाली व एक प्रकारे कॉंग्रेसच कॉंग्रेसचा पराभव करु लागली. मोठया प्रमाणात बंडखोरी झाली. याचा परिणाम १९७२ च्या विधानसभा निवडणूकांवर झाला. १२ पैकी ६ जागांवर कॉंग्रेस, ४ जागांवर अपक्ष आणि २ जागा कम्युनिष्ठ पक्षास मिळाल्या. १९७२ नंतर जिल्ह्याच्या राजकारणात राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील राजकीय बदलांचा परिणाम झाला. सत्तेसाठी व सत्तेपुरते राजकारण करणाऱ्यांचे महत्त्व वाढले. या दशकात कॉंग्रेस अंतर्गत विखे-खताळ-रोहमारे यांचा एक गट तर काळे-कोल्हे-निंबाळकर-थोरात यांचा दुसरा गट निर्माण झाला. १९७५ मध्ये आणीबाणी जाहीर झाली. त्यानंतर १९७७ मध्ये लोकसभा निवडणूका झाल्या. देशपातळीवर कॉंग्रेसला आव्हान निर्माण झाले असले तरी जिल्ह्याच्या राजकारणात मात्र कॉंग्रेसने यश संपादन केले. हे निवडणूक निकालावरुन दिसून येते. लोकसभा निवडणूकीनंतर मात्र जिल्ह्यात कॉंग्रेसमध्ये फूट पडली व त्याचा परिणाम विधानसभा निवडणूकांवर झाला. १९७८ च्या विधानसभा निवडणूकांचे एकंदरीत चित्र बदलत गेले. कॉंग्रेसचे एकछत्री वर्चस्व राहिले नाही. या निवडणूकीत कॉंग्रेसला ८ जागा मिळाल्या. रिपब्लिकन १, जनता पक्ष २ तर अपक्षास व कम्युनिस्ट पक्षांस प्रत्येकी १ जागा मिळाली. या निवडणूकीपासून जिल्ह्याच्या राजकारणात कॉंग्रेस पक्षात अस्थैर्य निर्माण झाले. पक्षापेक्षा व्यक्ती केंद्रीत राजकारणास अधिक महत्व प्राप्त झाले. तसेच जिल्ह्याच्या राजकारणात घराणेशाहीची वाढ झाली. १९८० च्या लोकसभा निवडणूकीत पुन्हा कॉंग्रेस पक्षास यश मिळाले. मात्र कॉंग्रेसमध्ये फूट पडून कॉंग्रेस (एस) स्थापन झाल्याने त्यांचा परिणाम विधानसभा निवडणूकीवर झाला १३ पैकी ९ जागांवर कॉंग्रेस (आय) तर कॉंग्रेस (एस) व कम्युनिष्ठ पक्षास प्रत्येकी १ जागा मिळाली तर जनता पक्षास २ जागा मिळाल्या. या दशकात कॉंग्रेस (आय) व कॉंग्रेस (एस) मध्येच सत्ता संघर्ष पाहण्यास मिळाला.

१९८० ते १९९० च्या दशकाचा विचार करता १९८५ च्या विधानसभा निवडणूका इंदिरा गांधीच्या हत्येमुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेचा परिणाम होता. त्यामुळे सत्ता संघर्ष तीव्र असतांनाही कॉंग्रेसला ८ जागा, एस कॉंग्रेसला २ जागा, जनता पक्ष २ व १ अपक्ष कॉंग्रेस बंडखोर निवडून आला. या निवडणूकीत स्वकर्तृत्वावर निवडून आलेले तरुण नेत्यांबरोबर घराणेशाहीचा वारसा असणारे नविन नेतृत्वही पुढे आले. या दशकात एकीकडे जिल्ह्याच्या राजकारणात नव्या पिढीचा उदय तर दुसरीकडे सहकार, समाजकारण व राजकारणातील घराणेशाहीचाही प्रारंभ झाला. या दशकाच्या उत्तरार्धात १९८९ ला लोकसभा निवडणूक झाली त्या अगोदर कॉंग्रेस आय मध्ये एस कॉंग्रेस विलीन झाले. १९९० ला विधानसभा निवडणूक झाली. लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेस पक्षास यश मिळाले. त्यामुळे जिल्ह्यात कॉंग्रेसची ताकद काही प्रमाणात वाढली. परंतू पक्षांतर्गत गट-तट मात्र कायम राहिले.१९९० मध्ये



Scanned by TapScanner

विधानसभा निवडणूका झाल्या. या निवडणूकीत शिवसेना, भाजप या पक्षांचा प्रभाव लक्षणीय वाढल्याचे निवडणूक निकालावरुन दिसून आले. यास काँग्रेस अंतर्गत गटबाजी व शह-कटशहाचे राजकारण काही प्रमाणात कारणीभूत ठरले.

**निष्कर्ष :-**

१. जिल्ह्याच्या राजकारणात स्वातंत्र्यात्तर काळापासून डाव्या पक्षांचा प्रदीर्घकाळ प्रभाव होता. मात्र १९८० नंतर त्यांचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला.

२. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाचा परिणाम जिल्ह्याच्या राजकारणावर झाला. देशात व महाराष्ट्रात भाजप सातत्याने काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यामुळे जिल्ह्यातील डाव्या विचाराच्या अनेक मातब्बर नेत्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसचा प्रभाव वाढला.

३. जिल्ह्यात डाव्या विचारांचा प्रभाव कमी झाल्यानंतर काँग्रेसमध्ये सत्ता स्पर्धा तीव्र होऊन गटातटाचे व शहा काटशहांचे राजकारण सुरु झाले. त्याचा परिणाम काँग्रेसच्या यशपशावर झाला.

४. जिल्ह्यातील राजकीय वाटचालीचा विचार करता डाव्या विचारसरणीस मानणाऱ्या या जिल्ह्यात नंतरच्या काळात काँग्रेस पक्षाचा प्रभाव वाढला. तर १९९० च्या दक्षकात शिवसेना भाजपासारख्या उजव्या विचारसरणीच्या पक्षांचा प्रभाव वाढताना दिसून येतो. त्यामुळे जिल्ह्याचा राजकीय प्रवास लाला-तिरंगा-भगवा असा म्हणजेच डावीकडून उजवीकडे झाल्याचे दिसून येते. हे जिल्हयाच्या दृष्टीने सर्वात मोठे वैचारिक परिवर्तन आहे.

५. जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या वाटचालीचा विचारकरता असे दिसून येते. पक्षीय राजकारणाबरोबरचं व्यक्ती केंद्रीत राजकारण, घराणेशाही व सोयरेशाहीचे राजकारण जिल्ह्यात चालू आहे.

६. सहकार क्षेत्राचा विकास झाल्यामुळे या क्षेत्रातून नेतृत्व पुढे आले. तसेच शेती क्षेत्रातूनही नेतृत्व पुढे आले. व त्यांनी जिल्ह्याच्या राजकारणात आपला प्रभाव वाढविला. शुगर लॉबीचा प्रभाव वाढल्याचे दिसून येते. सहकारी साखर कारखान्यांकडून मनुष्य बळाचा व पैशाचा एखादया यंत्रणेसारखा वापर होऊ लागला. त्यामुळे सहकार क्षेत्रातील साखर कारखाने व सहकारी बँका यावर आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी नेतृत्वाने प्रयत्न केले.

**संदर्भसूचि :-**

१. पळशीकर सुहास, २००४, जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगावा प्रकाशन, पुणे.

२. पवार प्रकाश २०१६ सामाजिक न्यायाची संघर्षभूमी: काँग्रेसमधील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. चोरमारे विजय, २०१४, महाराष्ट्राचे राजकारण: नवे संदर्भ नवता बुक वर्ल्ड, मुंबई.

४. पळशिकर सुहास आणि सुहास कुलकर्णी (संपा) २००७, महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष, राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे

५. पळशिकर सुहास व नितीन बिरमल (संपा) २००४, महाराष्टाचे राजकारण: राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिभा प्रकाशन, पुणे.

६. महाराष्ट्र निवडणूक आयोग, २०१४, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग अहवाल लोकसभा निवडणूक १९५२ ते २०१९, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७. विसावे विलास २०१६, भारतातील घटनात्मक आणि राजकीय प्रक्रिया, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.

७. जाधव तुकाराम, अभय कांता, विवेक घोटाळे, विजय कुंजीर, महेश शिरापुरंकर (संपा) २०१५, महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर द युनिक इन्स्टिटयूट ऑफ हायर लर्निंग, पुणे.

८. अगलावे प्रदिप, २०००, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विदया प्रकाशन नागपूर.

९. जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर २००९ लोकसभा निवडणूक पूर्वपिठीका, जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर.

१०. जिल्हा माहिती अधिकारी, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९९९ एकदृष्टीक्षेप जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर

११. देशमुख गणेश (का.संपा.) १९९८ ग्रामवेद, के.बी.रोहमारे स्मृतीग्रंथ, प्रकाशन समिती, कोपरगांव.

१२. महाराष्ट्र शासन, १९६२ ते २०१४, विधानसभा व विधानपरिषद सदस्यांचा परिचय. मुंबई.

१३. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, विधानसभा निवडणूक अहवाल, १९९४ ते २००३, २००४ मुंबई.

१४. फडके य.दी., १९९९, लोकसभा निवडणूका १९५२ ते १९९९, अक्षर प्रकाशन, मुंबई.

१५. पळशिकर सुहास, कुलकर्णी, २०११, सत्ता संघर्ष, समकालीन प्रकाशन, पुणे.

१६. साने रविकिरण, निलीमा साने, २००९, महाराष्ट्राची शासन आणि राजकारण, डायमंड पब्लीकेशन, पुणे.

१७. अहमदनगर जिल्हयातील सर्व वृत्तपत्रे, (निवडणूक काळातील) विशेष भर, दैनिक समाचार, दैनिक सकाळ, दैनिक लोकसत्ता, नगर टाईम्स,

१८. www.eci.gov.in

❑❑❑



Scanned by TapScanner

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December 2019

Vol. 6 Issue 4 (B)





**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by TapScanner

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-November-December 2019**

**Vol. 6 Issue 4 (B)**

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-



Scanned by TapScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | वीरशैव संतकवी लक्ष्मण महाराजांची हिंदी रचना | डॉ.प्रवीण कारंजकर | 159 |
| 33 | नागपूर जिल्ह्यातील सांस्कृतिक क्षेत्रातील संतांचे कार्य | डॉ. प्रकाश शेन्डे | 163 |
| 34 | मराठी सामाजिक कादंबरी संकल्पनात्मक स्वरूप | श्री.गिरीधर काचोळे | 167 |
| 35 | मराठी साहित्यातील : आंबेडकरवाद | डॉ. गोविंद रावळेकर | 174 |
| 36 | दलित आत्मकथने : भाषिक वैशिष्ट्ये | डॉ. प्रकाश जाधव | 179 |
| 37 | उत्तम कांबळे यांचे कथा वाङ्मय | प्रा. माधव सूर्यवंशी | 186 |
| 38 | ग्रामीण साहित्य आणि सामाजिक चळवळ : एक दृष्टिक्षेप | डॉ. विनोद भालेराव | 189 |
| 39 | गावातील ढासळत चाललेल्या गावपणाचा शोध घेणारे गाव | डॉ.गजानन मुंधे | 192 |
| 40 | रामराव झुंजारे यांच्या 'जलमबेडी' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन | प्रा.लालबा दुमटकर | 197 |
| 41 | १९९० नंतरची संस्कारशील बालकादंबरी | संतोषकुमार राठोड | 201 |
| 42 | अहिल्याबाईच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारी कादंबरी 'कर्मयोगिनी' | डॉ. रेखा वडिखाये | 205 |
| 43 | 'वर आभाळ खाली धरती' : एक आकलन | डॉ. गायत्री गाडेकर | 209 |
| 44 | अशोक कोतवाल यांचे ललितगद्य : स्वरूप आणि वैशिष्ट्ये | प्रा.मंजुळा साळवे | 214 |
| 45 | वाचन-संस्कृती आणि ग्रंथालयाची भूमिका | डॉ.जे.एफ.पाटील | 218 |
| 46 | महात्मा फुलेंच सामाजिक न्याय आणि सामाजिक सुधारणेतील योगदान | डॉ. वसंत खरात | 222 |
| 47 | राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण आणि अस्पृश्यता निवारण्याचे कार्य | डॉ. लता आंदे | 227 |
| 48 | गोपाळ गणेश आगरकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान | श्री. सुरेश दांडगे | 232 |
| 49 | लाला लजपतराय यांचे सामाजकार्यातील योगदान | डॉ. राजेंद्र रासकर | 238 |
| 50 | महात्मा गांधीजींचे राष्ट्रवादविषयक विचार | डॉ. विक्रमराव पाटील | 243 |
| 51 | महात्मा गांधी : अहिंसा व समकालीन हिंसेचे वास्तव | डॉ. एकनाथ खरात | 246 |
| 52 | महात्मा गांधीचे सामाजिक व स्त्री-सुधारणा धोरण | अनिल वासनिक | 256 |
| 53 | महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना | डॉ. विजया राऊत | 259 |
| 54 | स्त्री साहित्यातून स्त्री मनाचा वेध | प्रा. वंदना नेमाडे | 262 |
| 55 | स्त्रीभ्रूणहत्या : स्त्रीवादी दृष्टीकोन | डॉ. अश्विनी खापरे | 266 |
| 56 | स्त्री लेखिकांचे अनुवादित मराठी साहित्य | प्रा. तुकाराम भवर | 271 |
| 57 | पेशवेकालीन स्त्री जीवन | डॉ.लता आंदे | 277 |
| 58 | मानवी हक्क : महिला व बालके | डॉ. धनराज चौखुंडे | 281 |
| 59 | खान्देशातील कुंभार समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे अध्ययन | सचिन कुंभार | 287 |
| 60 | इतिहासाच्या अभ्यासात वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व | डॉ. निवासराव वरेकर | 292 |
| 61 | चिमूर तालुक्यातील असंघटीत कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन | डॉ. हरेश गजभिये | 296 |
| 62 | विदर्भातील शेतकरी चळवळीच्या नेतृत्त्वाचा अभ्यास : एक सामीक्षात्मक अध्ययन | प्रा.राजू लिपटे | 300 |
| 63 | बँकांच्या राष्ट्रीयकरणाची ५० वर्षे | डॉ.ए.डी.गोस्वामी | 303 |
| 64 | पूर्व-पश्चिम विदर्भातील शेतीप्रश्नांच्या राजकीयकरणाचा राज्यशास्त्रीय अभ्यास | प्रा.राजू लिपटे | 307 |
| 65 | जिल्हा नियोजन समितीच्या वार्षिक योजनांचा अभ्यास | प्रा. दिपक चौधरी | 311 |
| 66 | अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया :राजकीय पक्षांची वाटचाल (१९९०ते २०१९)-एक अभ्यास | श्री जिजाभाऊ घुले आणि डॉ.संजय गायकवाड | 317 |




Scanned by TapScanner

| | | |
|---|---|---|
| 67 | अनुसूचित जातींच्या शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास **डॉ. मनोजकुमार गायकवाड आणि विनोद नन्नवरे** | 330 |
| 68 | भारतातील आघाडी सरकार आणि दहशतवाद **श्री.शिवाजी आडे** | 336 |
| 69 | भारतातील बेरोजगारी : स्वरूप, कारणे आणि उपाययोजना **डॉ. योगेश पाटील** | 342 |
| 70 | सोशल मीडिया : दशा आणि दिशा **डॉ. सुहास पाठक** | 347 |
| 71 | पर्यावरण विषयक कायद्याचे शिक्षण व पर्यावरणाचा समतोल **डॉ.महेंद्रकुमार कटरे** | 353 |
| 72 | महाराष्ट्र राज्यातील बदलेल्या पर्यावरणीय समस्यांचे व्यवस्थापन **डॉ. प्रकाश शेन्डे** | 356 |
| 73 | महाराष्ट्र : जलसाक्षरतेची आवश्यकता व नियोजन स्वरूप **डॉ.विवेक चौधरी** | 359 |
| 74 | भारतात वाढते वायू प्रदूषण आणि समाजाची भूमिका **डॉ. नवनाथ शिंदे** | 363 |
| 75 | माध्यम संवाद **डॉ. सुहास पाठक** | 368 |
| 76 | चेक ट्रंकेशन सिस्टम : एक नाविन्यपूर्ण चेक वटवणूक सुविधा **डॉ. विजय कुंभार** | 373 |
| 77 | ई-बँकिंग आणि कार्य पद्धती **डॉ. एफ. एन. महाजन** | 386 |
| 78 | ७४ वी घटना दुरुस्ती व नियोजनाचे आर्थिक विकेंद्रीकरण **प्रा. दिपक चौधरी** | 391 |
| 79 | ॲड. हरिदास बाबू आवळे यांची शेड्युल्ड कास्ट फेडरेशनमधील भूमिका **डॉ.चंद्रशेखर पाटील** | 400 |
| 80 | उच्चमाध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शन गरजा आणि शैक्षणिक संपादणूक यातील सहसंबंधाचा अभ्यास **श्री.भगवानसिंग राजपुत आणि डॉ. तुषार माळी** | 404 |
| 81 | इंद्रियनिग्रह एव दमः **प्रणव दर्शनानंद चौसाळकर** | 409 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.* **- मुख्य संपादक, रिसर्च जर्नी**

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258



Scanned by TapScanner

20/7-18

# CHRONICLE OF HU[illegible] AND CULTURAL STUDIES

SPECIAL ISSUE

## WOMEN EMPOWERMENT IN ANCIENT TO MODERN PERIOD



Editor
Mr. Pawde K. M.

Principal
Dr. A. D. Mohekar

ORGANIZED BY
DEPARTMENT OF HISTORY
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

(BOOK I)

Special Issue on the Occasion of National Conference on

## Women Empowerment in Ancient to Modern Period

(27 January, 2018)

Organized by

**Shikshan Maharshi Dnyandeo Mohekar Mahavidyalaya**

**Kalamb, Dist. Osmanabad**

**Mr. Pawde K. W.**
Editor

**Dr. Ashokrao Mohekar**
Principal

MGEW SOCIETY'S

CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES

KALYAN (MAHARASHTRA)

Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS

1. प्राचीन ते आधुनिक काळातील महिला सबलीकरण / डॉ. गोविंद देशमुख |7
2. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि स्त्री सबलीकरण /प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे |11
3. सातवाहन राज्यकर्त्यांचा स्त्री देवतांविषयक दृष्टीकोन / डॉ.भेलोंडे जगदिश व्यंकटराव |13
4. समाज सुधारक आणि महिलांचे सबलीकरण / डॉ.शिवाजी सोमला पवार |15
5. फातीमा बेगम : भारतातील पहिल्या महिला चित्रपट दिग्दर्शिका / प्रा.हमीद उमरअली काझी |19
6. Satyakka's contribution to Vachana Literature / Dr. Nalini Avinash Waghmare |23
7 Contribution of Revolutionary Women in Indian History / Dr. Kamble R.S. |26
८ भारतीय स्वातंत्र्य चळवळीत क्रांतीकारी स्त्रीयांचे योगदान / डॉ. आर. आर. पिंपळपल्ले |28
९ भारतीय ऐतिहासिक परिप्रेक्षातील कर्तृत्वान स्त्रिया : एक आढावा / प्राचार्य डॉ. वचन पवार |31
10 प्राचीनवाङ्मय आणि स्त्रीभ्रूणहत्या / प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के |33
11 हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यात गोदावरीबाई टेके व दगडाबाई शेळके यांचे योगदान / प्रा. डॉ. अंगद पवार |35
12 हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग / डॉ. आर. एस. पारवे |39
13. हमीद दलवाई – मुस्लिम स्त्री चळवळ / प्रा.वाईकर एस.बी |42
14. तथागत गौतम बुद्धाची स्त्रीविषयक भूमिका / प्रा डॉ डी. पी. हिंगमिरे |45
15. शैक्षणिक धोरण आणि महिला सबलीकरण / डॉ.विलास जाधव & प्रा.वाय.डब्ल्यू.शेख |48
16. महिला सबली करणासाठी पं.रमाबाईंचे योगदान / डॉ.नंदकुमार ज्ञानोबा जाधव |50
17. ज्ञानोदय आणि विधवा पुनर्विवाह चळवळ (इ.स.१८५१-१८६१) / डॉ.उत्तम पटारे |53
18 संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठवाड्यातील महिलांचे योगदान / डॉ. नरेंद्र देशमुख |57
19 स्त्री पुरुष समानतेच्या पुरस्कर्त्या : ताराबाई शिंदे / डॉ. भालेराव जी पी |59
20 हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील महिलांचे योगदान / प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव |61
21 हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचा सहभाग / डॉ.किशन केंद्रे |63
22 प्रबोधनकालीन स्त्रीयाचे शैक्षणिक उत्थान / डॉ. मोरे डी. ए. |68
23. स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग / डॉ. पी.बी. सिरसट |70
24. प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तृत्वान स्त्रिया / डॉ. एच.टी. सातपुते |72
25. प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तृत्वान स्त्रिया / प्रा.सविता तुकाराम तावडे |75
26. स्वातंत्र्यलढ्यातील महिलांचा सहभाग / डॉ. दत्ता उध्दव जाधव |78
27. धाडसी व्यक्तिमत्व गोदावरीबाई टेके / प्रा.डॉ. बावजे मंजुषा मुकुंदराव |82
28. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री-विषयक विचार / डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत |84
29. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील कस्तुरबा गांधीची भूमिका / प्रा.दिनकर मोहनराव रणदिवे |86
30. हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये दगडाबाई शेळकेंचे योगदान / प्रा.डॉ. विजया साखरे |88
31. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शिक्षणाच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचे प्रयत्न / गडगे शांता रंगनाथ |91
32. Empowerment of muslim women and law. / Dr.ShaikhHussain Imam |94
33. साताऱ्याच्या प्रतिसरकारमधील एक स्वातंत्र्य सेनानी राजमती पाटील यांचे कार्य / प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम |98
34. प्रशासकीय धोरण आणि महिला सबलीकरण / प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख |101
35. हैदराबाद मुक्ती लढ्यातील बीड जिल्ह्यातील महिलांचा राजकीय सहभाग. / प्रा.डॉ.सावंत के.डी. |104

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

31.

# महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शिक्षणाच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचे प्रयत्न

गडगे शांता रंगनाथ
सहा.प्राध्यापक व विभागप्रमुख, इतिहास विभाग, श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर ता.पारनेर, जि.अहमदनगर

'केल्याने होत आहे रे, आधि केलेचि पाहिजे' या उक्तीप्रमाणे महर्षि कर्वे यांनी महिला उदधार आणि स्त्री शिक्षणाचे कार्य केले. भारतातील अनेक सुधारकांनी विविध क्षेत्रामध्ये कार्य केले.परंतू महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या शिक्षकांपासून व सुधारक अगरकरांपासून प्रेरणा घेऊन आपले संपूर्ण जीवन स्त्रीयांच्या उन्नतीसाठी वाहून घेतले.स्त्री शिक्षण हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता.आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचा पाया रोवणारे ते क्रियाशील सुधारक होते, म. गांधी, पं. नेहरु, राजेंद्र प्रसाद, अल्बर्ट आईनस्टाईलन, मादाम मॉटेसरी, रविंद्रनाथ टागोर इत्यादींनी त्यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचा गौरव केल्याचे आपणाला दिसून येते. स्त्रीयांचा उध्दार झाल्याशिवाय देशाचा उध्दार होणार नाही.हे त्यांनी ओळखले होते.म्हणून महिला उध्दार आणि स्त्री शिक्षणाचे कार्य त्यांनी केले. स्त्री शिक्षणाचा प्रचार व प्रसारासाठी देशभर व प्रदेशामध्ये दौरे काढले, परदेशामधून अमेरिका व जपान येथून त्यांनी २७०००/- तर मोम्बासा, केनिया, युगांडा इत्यादी देशामधून ३४,०००/- रुपयांची देणगी स्त्री शिक्षणासाठी जमा केल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील स्त्रीयांनी सदैव ऋणी राहिले पाहिजे असा हा महापुरुष होता.स्त्री उध्दाराच्या कार्याला त्यांनी विधवा स्त्रीयांपासून सुरुवात केली, असली तरी समाजातील सर्व स्तरातील स्त्रीयांचे विविध प्रश्न सोडविण्याचे काम त्यांनी केले. महाराष्ट्रातील स्त्रीयांचे शिक्षण, विधवा पुनर्विवाह, अनाथ बालिकाश्रम, समाजसुधारणा, अखंड कर्मयोग, निःस्वार्थी व त्यागमय जीवन यांचे महर्षि कर्वे मूर्तिमंत प्रतिक होते. त्यांनी अनेक विधवा आणि अनाथ बालिकांचे शैक्षणिक पुनर्वसन केले.

**जीवनवृत्तांत :** भारतरत्न डॉ.धोंडो केशव कर्वे यांचा जन्म कोंकणातील शिरवली या गांवी झाला.वडील केशव, आई लक्ष्मीबाई, मोठा भाऊ भिकू बहिण अंबूताई असा त्यांचा परिवार होता.महर्षि कर्वे लहानपणापासूनच शांत, नम्र व व्यासंगी स्वभावाचे होते.त्यांचे प्राथमिक शिक्षण मुरुडच्या शाळेत झाले.सहावीची परिक्षा देण्यासाठी ते मुरुड ते कुंभार्ली घाट हे १२५ मैलांचे अंतर त्यांनी तीन दिवसात पायीपार केले होते.माध्यमिक शिक्षण त्यांनी मुंबई येथील रॉबर्ट मनी हायस्कूल मधून पूर्ण केले.पाचवी, सहावी, सातव्या इयत्तेमध्ये त्यांना शिष्यवृत्ती मिळाली होती.आपले शिक्षण त्यांनी शिष्यवृत्ती व शिकवण्यांच्या माध्यमातून पूर्ण केले.

शिक्षण होतअसतानाच वयाच्या १५ व्या वर्षी त्यांचा पहिला विवाह राधाबाई यांच्या बरोबर झाला.या पहिल्या पत्नीचा वयाच्या २७ व्या वर्षी बाळंतपणामध्ये मृत्यू झाला.१८८४ मध्ये एलफिन्स्टन कॉलेजमधून ते गणित हा विषय घेऊन बी.ए.ची परिक्षा पास झाले.१५ नोव्हेंबर १९८१ मध्ये ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले.या महाविदयालयात त्यांनी २३ वर्षे सेवा केली.पुढे हिंगणे येथे महिला आश्रमांची स्थापना केल्यानंतर पैशांच्या अडचणीमुळे हिंगणे ते फर्ग्युसन कॉलेज हा प्रवास ते पायी करीत.

प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी पंडिता रमाबाई यांच्या 'शारदा सदन' मधील गोदूबाई २८ वर्षाच्या विधवेशी लग्न केले. स्वतः विधवेशी पुर्नविवाह करुन स्वतःच्या कृतीने त्यांनी समाज सुधारणेची सुरुवात स्वतःपासून होते. हे दाखवून दिले. आगरकरांच्या उपस्थितीमध्ये जाहीरपणे झालेला हा पुण्यातील पहिला विधवा पुर्नविवाह होता. याचं गोदूबाई पुढे आनंदीबाई किंवा बाया कर्वे या नावाने प्रसिध्द झाल्या.या विवाहामुळे त्यांच्या मुळगांवी त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार घालण्यात आला.तर गोदूबाईंना ही सवाष्ण असूनही दुय्यम वागणूक दिली जात असे.पं.रमाबाईंच्या शारदा सदनांमधील विधवांनी त्यांचा सपत्नीक सत्कार केला.

**विधवा विवाह संघ :** ३१ डिसेंबर १८९३ रोजी वर्धा येथे विधवा विवाह संघाची स्थापना करण्यात आली.या संघाने हैद्राबाद येथील शिक्षक शं.सी.फडके या प्रथमवराचा विवाह सदाशिवराव गोवंडे यांच्या विधवा मुलींशी घडवून आणला.समाजातील विधवांची परिस्थिती सुधारण्याशिवाय समाजाचा उध्दार होणार नाही.हे वाटल्यामुळे तसेच १८५६ साली विधवा पुर्नविवाह कायदा समंत झाला असला तरी अशा प्रकारचे विवाह अल्प स्वरुपात होत असे.या कायदयाविषयी जागृती करणे व विधवा विवाहाला समाजाचा पाठिंबा मिळवून देणे या प्रमुख हेतूने या संस्थेची त्यांनी स्थापना केली.या संस्थेचे मुख्य उददेश पुढीलप्रमाणे होते.

१) विधवा स्त्रीयांचे पुर्नविवाह घडवून आणणे.
२) पुर्नविवाहीत कुटूंबाच्या मेळाव्याचे आयोजन करणे.
३) पुर्नविवाह बाबत लोकमत जागृती करणे.
४) पुर्नविवाह केलेल्या कुटूंबास समाजात मानाचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.
५) पुर्नविवाहाच्या बाबतीत जनजागृती करण्यासाठी दौरे व व्याख्यानांचे आयोजन करणे.

पुर्नविवाह केलेल्या विधवांच्या मुलांसाठी त्यांनी स्वतःच्या घरात वसतीगृह सुरु केले. तसेच १८९४ मध्ये पुर्नविवाह केलेल्या कुटूंबाच्या मेळाव्याचे आयोजन

केले.तसेच विधवा पुर्नविवाहाच्या पुरस्कारकर्त्यांचे एक संमेलन सुध्दा त्यांनी आयोजित केले होते.विधवा पुर्नविवाहासाठी लोकांच्या मनामध्ये सहानुभूती निर्माण व्हावी म्हणून १८९४ - ९५ मध्ये त्यांनी प्रचार दौरे काढले.१८९५ मध्ये या सभेचे नाव बदलून विधवा विवाह प्रतिबंधक-निवारक मंडळ असे ठेवले.

**अनाथ बालिकाश्रम :**

विधवा स्त्रीयांविषयी कार्य करत असताना स्त्रीयांसाठी आश्रम व शिक्षण देणाऱ्या संस्था शारदा सदनच्या धर्तीवर स्थापन केल्या पाहिजेत.असे वाटल्याने १८९६ मध्ये त्यांनी सदाशिव पेठेत अनाथ बालिकाश्रमाची स्थापना रावबहादूर भिडे यांच्यात वाड्यात केली. या संस्थेचे ते स्वतः चिटणीस तर डॉ. आर.जी. भांडारकर हे अध्यक्ष होते.हीच संस्था पुढे १९१० मध्ये हिंगणे येथे हलविण्यात आली.लेडी नॉर्थकोट, पं.रमाबाई रानडे, महाराज सयाजीराव गायकवाड, म. गांधी इ.ची कृपा या बालिकाश्रमाला मिळाला.

**अनाथ बालिकाश्रम संस्थेचे उद्देश :**

१) विधवा स्त्रीयांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविणे.
२) आपले जीवन निरर्थक नसून एक स्वतंत्र व्यक्तीमत्व आहे. हा विचार स्त्रीयांमध्ये रुजविणे.
३) विधवांच्या विचारांमध्ये आणि मनोवृत्तीत बदल घडवून आणने.
४) विधवांची दुःखे हलके करण्यास मदत करणे.
५) विधवांच्या शिक्षणाची सोय करणे.

प्लेगच्या साथीच्या काळात ही संस्था हिंगणे येथे हलविण्यात आली.या आश्रमातील विधवांची मने पुर्नविवाहासाठी वळविली जातील.या भितीने फार कमी विधवा या आश्रमामध्ये आल्या.पहिल्या पाच वर्षांच्या काळात या आश्रमातील मुलींची संख्या ४.७.११. १४, २१ अशी राहिली होती.पुढे महर्षि कर्वेंच्या विधवा मेव्हुणी पार्वतीबाई आठवले या आश्रमामध्ये आल्या.व आश्रमाच्या आधारस्तंभ झाल्या.संस्थेसाठी देणगी गोळा करताना लग्न सराईच्या वेळेस जेथून त्यांना लग्नांचे आमंत्रण येत असे.तेथे ते पिशवी घेऊन जात.व जेवणाच्या पंगतीच्या वेळेस पंगतीमध्ये मिळणारी दक्षिणा गोळा करत असे. लोकांसमोरील दक्षिणा गोळा करीत असताना ज्यांना कर्वे यांचे काम माहित आहे ते काहीच बोलत नसत परंतू अनोळखी लोकांमधील जर कुणी काही बोलले तर कर्वे त्यांस उत्तर देत जर चुकून या मांडवातील वधू विधवा झाली तर तिला आमच्याच आश्रमात येणार अशा या आश्रमांपासून झालेला सर्वात मोठा फायदा म्हणजे खुद्द विधवा वर्गाच्या अंतःकरणात त्याने जो आशेचा नवा अंकूर निर्माण केला होय. आपले जीवन निःरर्थक नसून तो एक सामाजिक पुना आहे हा विचार विधवा स्त्रीयांमध्ये या आश्रमाने रुढ केला. या आश्रमाविषयी त्यांनी आपल्या आत्मचरित्रामध्ये पुढील प्रमाणे नोंद केली आहे.

**महिला महाविदयालय :** बालविवाहाला आळा घालणे व योग्य काळात विवाह होण्यापूर्वीच्या काळामध्ये मुलींना आपल्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी मार्गदर्शन करणे या हेतूने महिला महाविदयालयाची स्थापना करण्यात आली.या महाविदयालयात सुमाता, सुपत्नी होण्यासाठी आवश्यक असणारे अभ्यासक्रम शिकविले जात.६ मार्च १९०७ रोजी प्रकाशित झालेल्या दैनिक ज्ञानप्रकाश या वृत्तपत्रात कर्वे यांनी महिला विदयालयाचे उद्देश पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

१) गृहिणी पदांची जबाबदारी व समाजविषयक कर्तव्यांची जाणीव असणाऱ्या सुशिक्षित स्त्रीया तयार करणे.
२) मुलींच्या विवाहाचे वय वाढविण्याचा प्रयत्न करणे.
३) भारतातील स्त्रीयांनामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे.

**निष्काम कर्ममठ :**

गोपाळकृष्ण गोखले यांच्या 'भारत सेवक समाज' यापासून प्रेरणा घेऊन ४ नोव्हेंबर १९०८ रोजी निष्काम कर्ममठाची कर्वे यांनी स्थापना केली. सामाजिक सुधारणांसाठी निःस्वार्थ कार्यकर्ते निर्माण करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. या संस्थेच्या सभासदाने फळाची अपेक्षा न धरता समाज सेवा करणे व साधे सरळ जीवन जगावे ही अट होती. महिला आश्रम व महिला विदयालयाला निःस्वार्थीपणे काम करणारे समाज सेवक तयार करण्यासाठी या संस्थेची सुरुवात करण्यात आली. या मठामध्ये सामिल होणाऱ्या प्रत्येकाला पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. माझे स्वतःचे जे काही आहे. त्यावरील सर्व हक्क व अधिकार मी सोडून देत आहे.मी आजपासून या मठाचा सेवक झालो आहे.आणि माझ्यासाठी व माझ्या कुटूंबासाठी मठजी तरतूद करेल.ती मी स्वेच्छने मान्य करील.या मठासाठी त्यांनी पुढीलप्रमाणे नियम केले होते.

१) मठातील सेवकांनी आपले राहणीमान साधे ठेवावे.
२) वागणूक शुध्द ठेवणे.
३) मनामध्ये कुणाच्याही द्वेष करु नये.
४) मठाच्या सर्व नियमांचे पालन करावे.
५) विदयार्थ्यांनींसाठी धान्यरुपी मदत जमविणे.

परंतू ही आदर्श संस्था जास्त प्रगती करु शकली नाही.

**महिला विदयापीठाची स्थापना :** १९१५ साली महर्षि कर्वे यांच्या वाचनामध्ये जपानमधील महिला विदयापीठाची माहिती आली.व अशा प्रकारचे महिला विदयापीठ आपण ही का सुरु करु नये असा विचार आल्यानंतर वयाच्या ५८ व्या वर्षी त्यांनी महिला विदयापीठाच्या निर्मितीला सुरुवात केली आदर्श माता आदर्श गृहिणी निर्माण होण्यासाठी महिलांना त्यांच्याच मातृभाषेतून शिक्षण दिले जाण्याची गरज सुध्दा या विदयापीठाच्या निर्मितीसाठी कारणीभूत ठरली १९१५ च्या सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना महिला विदयापीठाचे उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) स्त्रीयांना उच्च शिक्षण देणे.
२) प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, पाककला, चित्रकला व गायनकलेचे शिक्षण देणे.

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

३) स्त्रीयांना स्वावलंबी व स्वाभिमानी बनवणे.
४) आधुनिक शिक्षणास चालना देणे.
५) समाजातील अंधश्रध्दा दूर करण्यासाठी विज्ञान विषय शिकवणे.
६) आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने आरोग्य शास्त्रांविषयी माहिती देणे.
७) समाजातील सर्व स्तरातील स्त्रीयांना शिक्षण उपलब्ध करुन देणे.
८) शिक्षणाबद्दल गोडी निर्माण व्हावी म्हणून मातृभाषेतून शिक्षण देणे.
९) इंग्रजीचे महत्व ओळखून इंग्रजीचे हीअध्ययन करणे.
१०) स्त्रीयांचे शारीरीक व मानसिक भेद लक्षात घेवून विदयापीठाच्या अध्ययनात विविधता आणणे.

या विदयापीठात माध्यमिक प्रशिक्षण पदवी, गृहविज्ञान पदवी, परिचारिका पदवी यासारखं अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. सर विठ्ठलदास ठाकरसी या धनशूर व्यक्तीने त्यांच्या मातोश्री श्रीमती.नाथीबाई दामोदर ठाकरसी यांच्या स्मरणार्थ १५ लाखांची देणगी या विदयापीठास दिल्याने हे विदयापीठ आज एस.एन.डी.टी. विदयापीठ (श्रीमती.नाथीबाई दामोदर ठाकरसी) या नावाने ओळखले जाते.पुढे हळूहळू पुणे, मुंबई, सातारा, बेळगांव, वाई, सोलापूर, सांगली येथील मुलींच्या शाळा या महाविदयालयास जोडण्यात आल्या.

**महाराष्ट्र ग्रामीण प्राथमिक शिक्षण मंडळ :-**

ग्रामीण भागातील निरक्षरता दूर करण्याच्या हेतूने त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना केली.या संस्थेमार्फत ग्रामीण भागात जेथे शाळा नसतील तेथे लेखन, वाचन, गणित शिकवणाऱ्या ४० शाळा सुरु करण्यात आल्या.

**अध्यापिका विदयालय :-**

१९७१ मध्ये सुरु केलेले अध्यापिका विदयालय हे महिला विदयालयाच्या वतीने चालवले गेले.या विदयालयातील शिक्षणामुळे अनेक स्त्रीयांना प्राथमिक शाळांमध्ये शिक्षिका होता आले.पार्वतीबाई आठवले या विदयालयाच्या आधारस्तंभ होत्या.त्यांच्या मृत्यूनंतर या महाविदयालयास पार्वतीबाई अध्यापिका विदयालय असे नाव देण्यात आले.

**महर्षि कर्वेचा गौरव :**

महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची व स्त्रीयांच्या सर्वांगीण प्रगतीची चळवळ गतिमान केल्यावर त्यांच्या कामगीरीचा मोठ्या प्रमाणावर गौरव करण्यात आला. बनारस, पुणे, मुंबई इ.विदयापिठांनी त्यांना D. LIT.L.L.D. या सन्मानदर्शक पदव्या दिल्या.भारत सरकारने त्यांना १९५५ मध्ये पद्मविभूषण व १९५८ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च बहुमान देऊन त्यांचा गौरव केला.

महात्मा गांधी यांनी १९२८ मध्ये यंग इंडिया या पत्रात महर्षि कर्वे यांच्या विषयी पुढील प्रमाणे गौरवउद्गार काढले होते. "प्रो.कर्वे यांचे आत्मविसर्जन", त्यांची अविभ्याचारी, कर्तव्यनिष्ठा त्यांचा अश्रान्त उत्साह, कोणत्याही परिस्थितीत त्यांनी सांभाळलेली सचोटी, विरोधी वातावरणात त्यांनी टिकवून ठेवलेली श्रद्धा त्यांचा अदम्य आशावाद ही राष्ट्रांची पहिल्या प्रतीची पुंजी आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. आठवले पार्वतीबाई, माझी कहाणी -राजहंस, प्रकाशन २०१३.
२. भिडे जी.एल., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, १९९४
३. चांदवरकर गणेश, महर्षि कर्वे, पॉप्युलर प्रकाशन, १९५८
४. घांडके ह.म., महाराष्ट्र गाथा, राजहंस, २०००.
५. बामन मंगला, महाराष्ट्रातील समाजसुधारक, दाभाने रामचंद्र & कं., २००१.
६. कोलारकर श.गों, आधुनिक भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन, १९९५
७. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विदया बुक पब्लिशर्स, २०१६
८. कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्था, २००८
९. मालुंजकर रविंद्र, शिक्षण संक्रमण, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, २०१७
१०. सरदेसाई बी.एन., आधुनिक महाराष्ट्र, फडके प्रकाशन, २०००.
११. तेरणीकर सुलभा, महर्षि कर्वे स्त्री शिक्षण याच्या गाथा शतकाची, महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्था.
१२. ध्यासपर्व चित्रपट - दिग्दर्शक अमोल पालेकर.

❑❑❑